# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि. ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

| विषय | मा. महासभा<br>दि. २९/१०/२०२३ सकाळी ११:०० वा<br>प्रकरण क्र - ४० ते ४६<br>मूळप्रत |
|---|---|

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | ६<br>१३/१४ |

## अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त-१/ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०८/१०/२०१३.

## मा. महासभा

**मा. महासभा सूचना क्र. :- ०६, दिनांक ०८/१०/२०१३.**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शनिवार दि. १९/१०/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०६, दि. ०८/१०/२०१३ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. महासभा सुचना क्रमांक ०६, दि. ०८/१०/२०१३ सोबतची विषय पत्रिका**
**सभा शनिवार दि. १९/१०/२०१३**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे** – |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – |
| ४० | दि. ०६/०७/२०१३ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका** – |
| ४१ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे.<br>निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे<br>१) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद<br>२) श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो<br>३) श्री. प्रमोद जयराम सामंत<br>४) श्री. राजेश शंकर वेतोसकर<br>५) डॉ. राजेंद्र जैन<br>६) डॉ. रमेश जैन<br>७) श्री. संदिप मोहन पाटील<br>८) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील |
| ४२ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे. |
| ४३ | महिला व बालकल्याण समितीवर नऊ सदस्यांची नेमणूक करणे. |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – |
| ४४ | निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलींच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य देण्याबाबत. (दि. ३०/०९/२०१३ रोजीच्या मा. महिला व बालकल्याण समितीने शिफारस केलेला ठराव क्र. १०) |
| ४५ | निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलामुलींना आर्थिक मदत प्रदान करणेबाबत. (दि. ३०/०९/२०१३ रोजीच्या मा. महिला व बालकल्याण समितीने शिफारस केलेला ठराव क्र. ११) |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** – |
| ४६ | महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** – |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०८ ऑक्टोबर २०१३

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १५/१०/२०१३.

## मा. महासभा दि. १९/१०/२०१३
## पुरक घोषणा

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक १९/१०/२०१३ रोजी आयोजित केलेल्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ४७ | सन्मा. सदस्या सौ. निलम हरिश्चंद्र ढवण यांचा दिनांक १०/१०/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>------------------------------------------------<br>अपुऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यासंदर्भात. |
| ४८ | सन्मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांचा दिनांक १४/१०/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>------------------------------------------------<br>नवघर शाळेच्या मैदानाबाबत. |
| ४९ | सन्मा. सदस्य श्री. अशरफ मेहमुद शेख यांचा दिनांक १४/१०/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>------------------------------------------------<br>नरेंद्र पार्क ज्युपीटर इमारतीच्या दोन्ही बाजुचा परिसर ''ना फेरीवाला क्षेत्र'' घोषीत करणेबाबत. |

(हरेश ल. पाटील)
**महापालिका नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

सौ. निलम हरिश्चंद्र ढवण
नगरसेविका
गटनेता-शिवसेना
मिरा भाईंदर महानगरपालिका
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय,
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

**निवास** : बी/१०३, सरस्वती सदन नं. ३, सरस्वती नगर, नवघर रोड, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५.
**कार्यालय** : शॉप नं. ३, साईगिरी सोसायटी, साईबाबा मंदिराजवळ, साईबाबा नगर, नवघर रोड, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५.
**मोबाईल** : ९८६९२६५६२२ / ८६५५८८०५२५

जावक क्र. प्रकरण क्र. करिता

दिनांक : 8/10/13

प्रति,
मा. सचिव
मि. भा. म. पा.
भाईंदर (प)

विषय : "ज" च्या प्रस्तवाखाली खालील विषय येत्या महासभेत घेण्यासंदर्भात
'अपुऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यासंदर्भात'

महोदय,

मिरा भाईंदर महानगर पालिकेतील प्रशासन कार्यालयात बऱ्याच विभागातील कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे मिरा भाईंदर मधील क्षेत्रामध्ये विविध उपक्रम योग्य रितीने राबविण्यास अडथळे निर्माण होतात. त्यामुळे ज्या दिशेने वॉर्डचा विकास व सामाजिभिमुख कामे वेळच्यावेळी व्हायला पाहीजेत, ती होत नाहीत. उदा. फेरीवाले हटविणे, बॅनर काढणे, M.P.W आरोग्य विभाग. विविध प्रभाग कार्यालयात देखील "कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या वाढविण्या" संदर्भात येत्या महासभेत सदरचा विषय घेऊन योग्य तो निर्णय घेण्यात यावा, व कामगाऱ्यांची संख्या वाढवून मिरा भाईंदर क्षेत्रातील सर्वच विभागामध्ये नागरिकांच्या सोयी व सुविधा व विकास करावा ही विनंती

धन्यवाद !

सौ. निलम हरिश्चंद्र ढवण
कार्यालय:- साईगिरी को-ऑ. हौ. सोसायटी, शॉप नं. 3, साईबाबा मंदीराजवळ, साईबाबा नगर, नवघर क्रॉस रोड, भाईंदर-पूर्व, जि. ठाणे - 401105
शिवसेना गटनेता व नगरसेविका प्रभाग ७

आपली विश्वासू
Dhavan.
सौ. निलम ह. ढवण
गटनेता / नगरसेविका

सचिव/पु.क्र./९७/२/१३-१४, १४/१०/१२


# सौ. प्रभात प्रकाश पाटील

नगरसेविका

मिरा भाईंदर महानगरपालिका

विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय,

स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),

ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

संपर्क कार्यालय : गुलमर्ग अपार्टमेन्ट, नवघर रोड, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५. मोबाईल : 9892409323

निवास : पारिजात बंगलो, इंद्रलोक फेस -४, न्यु गोल्डन नेस्ट रोड, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५. E-mail: prabhat.p.patil@gmail.com


जावक क्र ______________ दिनांक : १४/१०/१२

प्रति,

मान. सचिव,

मिरा भाईंदर महानगरपालिका.

**।। अनुसूची "ड" प्रकरण २, नियम ज अन्वये प्रस्ताव ।।**

विषय :- नवघर शाळेच्या मैदानाबाबत.

महोदय,

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या काही वास्तू आणि मैदाने भाड्याने देण्याबाबत मा. महासभा दि. २०१३/२०१३ रोजीच्या सभेत विषय घेण्यात आला होता. त्यात नवघर मैदान भाड्याने देणेबाबतही विषय झाला होता.

त्यानुसार नवघरच्या मैदानात वर्षभर काही ना काही कार्यक्रम होत असतात. कधी कोणा राजकीय पुढाऱ्यांचे वाढदिवस, शाळांची स्नेहसम्मेलने, धार्मिक प्रवचने, भागवत सप्ताह, महिला दिवस, तर कधी करमणूकीचे कार्यक्रम.

ह्या दोन-तीन महिन्यात तर तेथे कहरच झाले. पालिकेचा अभिनव उपक्रम म्हणून कृत्रिम तलावासाठी मैदान खोदले गेले. पूर्ण खोदाई झाली आणि मग कोणाला तरी दहीहंडी करण्याची परवानगी दिली गेली. खोदलेले मैदान बुजविण्यात आले. हंडी झाली आणि मैदान पुन्हा खोदले. कृत्रिम तलाव केला गेला. पुन्हा खड्डा भरला गेला. मैदान लेवल केले. आठ दिवस बरे गेले. मैदान पुन्हा खालून वर कव्हर झाले. कारण तेथे नवरात्रीची स्थापना झाली. दहा दिवस आधी मंडप घालण्यात आला. दहा दिवसाचा कार्यक्रम (दसऱ्यापर्यंत) आणि पुढचे १० दिवस मैदानातील मंडप काढायला. एक महिना आणि गेले कित्येक महिनों-महिने हे मैदान सतत रिजर्व्ह आहे. असं किती करोड रुपये आपणांस त्या पासून उत्पन्न मिळते माहित नाही. पण करोडोंची स्वप्ने डोळ्यात तरळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हक्कावर मात्र आपण गदा आणित आहोत.

खरे तर ते महानगरपालिकेचे मैदान नसून ते नवघर मराठी शाळेचे मैदान आहे, हे आपण विसरतो आहोत. त्या मैदानावर पहिला हक्क शाळेतील विद्यार्थ्यांचा आहे. विद्यार्थ्यांच्या बौध्दिक विकासाबरोबर त्यांचा शारीरिक आणि मानसिक विकास होणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे अंग आहे. त्यासाठी

**सौ. प्रभात प्रकाश पाटील**
**नगरसेविका**
मिरा भाईंदर महानगरपालिका
**विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन**

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय,
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

संपर्क कार्यालय : गुलमर्ग अपार्टमेन्ट, नवघर रोड, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५. मोबाईल : 9892409323
निवास : पारिजात बंगलो, इंद्रलोक फेस -४, न्यु गोल्डन नेस्ट रोड, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५. E-mail: prabhat.p.patil@gmail.com

जावक क्र ____________ दिनांक : १४।१०।१३

शाळेला मैदान असणे हे शिक्षणात महत्त्वाचे मानले आहे. पण आमच्या इथे शाळा आहे तिला मैदानही आहे, पण ते विद्यार्थ्यांसाठी नसून समाजातील इतर घटकांसाठी आहे.

शाळेचा परिसर हा शांतता क्षेत्र असते परंतु इथे कार्यक्रमाच्या निमित्ताने सतत आवाजाचा कहरच असतो. मैदाने आणि शांतता क्षेत्र ह्याबाबत मान. उच्च न्यायालयाचे काही निर्देश आहेत, पण आपण ते कायमच धाब्यावर बसवले आहेत.

आपण म्हणाल हा पोलिसांचा प्रांत आहे. पण आपणास मी ह्या बाबतीत एवढेच सांगेन की, प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा हक्क ह्या कायद्याअंतर्गत शाळा आणि मैदाने ही त्यांची प्रॉपर्टी आहे व आपणांस माहितीसाठी हे सांगते की, ह्या मैदानात नागरिकांसाठी मॉर्निंग वॉकसाठी जॉगिंग ट्रॅकही बांधण्यात आले आहेत. लवकरच तेथे महानगरपालिकेचे ज्येष्ठ नागरिकांसाठीची विरंगुळा केंद्र चालू होणार आहे. ह्याच मैदानात आज बाजूच्या परिसरातील तरुण मैदानी खेळ खेळत असतात. ज्येष्ठ नागरिक वेळ घालवण्यासाठी बसत असतात. महानगरपालिकेचे प्राथमिक आरोग्य केंद्रही तेथेच आहे. मैदानात कार्यक्रमांना परवानग्या दिल्यामुळे आपण एकाच वेळी शालेय विद्यार्थी, तरुण मंडळी, ज्येष्ठ नागरिक आणि परिसरातील स्थानिक रहिवासी ह्यांवर अन्याय करीत असतो. हे ध्यानात ठेऊन ह्या मैदानात कोणत्याही कार्यक्रमांसाठी परवानगी देऊ नये.

आपली विश्वासू,

(प्रभात प्रकाश पाटील)
नगरसेविका
मिरा भाईंदर महानगरपालिका.

# अशरफ म. शेख
नगरसेवक
मिरा भाईंदर महानगरपालिका
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन(S.E.O.)

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय,
छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

कार्यालय : सेंट्रल कॉंग्रेस ऑफिस, अस्मिता एस्कॉन - १, नया नगर, मिरा रोड (पूर्व), जि. थाना - ४०१ १०७
घर : ए / ५०५, अस्मिता होराईझन को. ओप. हाऊ. सो. ली., स्टेशन रोड, नयानगर, मिरा रोड (पूर्व), जि. थाना - ४०१ १०७
मोबाईल : 9819478636 E-mail : shaikhashraf123123@yahoo.co.in


जावक क्र. ________________ दिनांक : १२.१०.२०१३

प्रति,
मा. नगरसचिव सो.,
सचिव विभाग,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

विषय :- "ज" अन्वये प्रस्ताव दि. १९/१०/२०१३ च्या मा. महासभेमध्ये घेणेबाबत...
संदर्भ :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुचित "ड" प्रकरण २.

महोदय,

वरील विषयानुसार कळविण्यांत येते की, खालील विषयाचा **"ज" अन्वये प्रस्ताव** मा. महासभेमध्ये घेण्यात यावा.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत सन-२००८ मध्ये मिरा रोड पुर्व प्रभाग क्र. ३४ नरेंद्र पार्क ज्युपीटर इमारतीच्या समोरील दोन्ही बाजुचा परिसर फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषीत करण्यांत आले होते. परंतु तेव्हापासुन या ठिकाणी अनेक ठिकाणांहुन फेरीवाले, फळ विक्रेते, भाजी विक्रेते आपल्या हातगाड्या व सामान सुमान दुकानांच्या समोर लावतात आणि त्यामुळे शाळांच्या बसेस व महापालिका परिवहन बसेसच्या रहदारीस अडथळा निर्माण होतो व मोठ्या प्रमाणांत वाहतुकीची कोंडी होते. याचा परिणाम सदर रस्त्यावरुन ये-जा करणा-या नागरीकांना, शालेय विद्यार्थ्यांना, वृध्द नागरीकांना ये-जा करण्यास फार अडचण होते व प्रसंगी विलंब सहन करावा लागतो. **त्याकरीता नरेंद्र पार्क ज्युपीटर इमारतीच्या दोन्ही बाजुचा परिसर "ना फेरीवाला क्षेत्र"** घोषीत करण्यांत यावा.

आपला विश्वासु,

(अशरफ मेहमूद शेख)
नगरसेवक
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. १९/१०/२०१३ रोजी आयोजित केली आहे.**
**सदर सभेकरिता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| प्रश्न |
|---|
| **१७ श्री. लियाकत गफ्फार शेख मा. सदस्या यांनी दि. ०४/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मालकी किंवा सरकारी जागेतून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्यावतीने बांधलेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक रस्त्यांवर अतिक्रमण किंवा जाणूनबुजून अडथळा निर्माण करीत असल्यास महानगरपालिकेकडून काय कारवाई अपेक्षित आहे? फक्त अतिक्रमण दुर करणार किंवा अशा लोकांवर एम.आर.टी.पी. ॲक्ट व इंडियन पिनल कोडचे ४३१ नुसार गुन्हा दाखल करणार का? या अगोदर अशी काही कारवाई झाली आहे का? असल्यास तपशिल द्यावा? किंवा याबाबतीत काही लोकप्रतिनिधींचे प्रलंबित प्रकरणे असल्यास माहिती द्यावी? |
| **१८ श्री. मदन उदितनारायण सिंह मा. सदस्या यांनी दि. १८/०२/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर विकास नियंत्रण नियमावली दि. १५/१०/२००० रोजी मंजूर झाले असून दि. २८/०२/२००२ ला नगरपालिकेचे रुपांतर महानगरपालिकेत झाले असून सदर नियमावलीत किती आरक्षणे आहेत? त्याची तपशिलवार माहिती. |
| अ) महानगरपालिकेद्वारा विकसीत करावयाचे ३५६ आरक्षण पैकी यादीतुन छाननी केली असता प्रायमरी शाळा ८२, प्ले ग्राऊंड २०, गार्डन ९१, हायस्कुल प्ले ग्राऊंड २५, बोटनीकल प्ले ग्राऊंड १, चिल्ड्रेन ग्राऊंड १, बोट क्लब १, पार्क १, सोसीयल फारेस्ट्री १, टेक्नीकल स्कुल प्ले ग्राऊंड १, स्विमींग पुल १ वरील प्रकारे आहेत. सदर आरक्षणापैकी महानगरपालिकेने कोणकोणती व किती आरक्षणे ताब्यात घेतलेली आहेत? |
| ब) प्रत्येक आरक्षणाचे एकूण क्षेत्रफळ किती? व ताब्यात घेतलेले क्षेत्रफळ किती?<br>१) ताब्यात घेताना टी.डी.आर. द्वारे किती आरक्षणे ताब्यात घेतली?<br>२) समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून किती आरक्षण ताब्यात घेतले आहे?<br>३) रेडी रेकनर रेट प्रमाणे मोबदला देऊन किती आरक्षण ताब्यात घेतले आहे? |
| क) महानगरपालिकेने ताब्यात घेतलेल्या आरक्षणाचे मालकांचे नाव व प्रत्येक आरक्षणामध्ये दिलेल्या टी.डी.आर. चे क्षेत्रफळ ची माहिती देण्यांत यावी. |
| ड) ताब्यात न घेतलेल्या आरक्षणाचे क्र. मालकाचे नांव व कारण. |
| इ) महानगरपालिकेने टी.डी.आर. माध्यमाने मोबदला न देता आरक्षण ताब्यात घेतले पाहिजे होते. सदर आरक्षण ताब्यात न आल्यामुळे होत असलेल्या गैरसोयीसाठी जबाबदार कोण? |
| ई) वरील ३५६ आरक्षण महानगरपालिकेने विकसित करण्यांपैकी अनेक आरक्षण ते ताब्यात घेतले नाही. सदर आरक्षण खाजगी मालकांकडून कुठलेही कर न भरता व्यक्तीशः / व्यावसायीक वापराकरीता वापरली जात आहे. नियमानुसार ते वापरु शकतात काय? |
| **१९ श्री. अनिल भोसले मा. सदस्य यांनी दि. २९/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (पश्चिम) सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये श्रीम. रिटा मॉटारो ह्यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामामुळे त्या लगत असलेल्या इमारतीतील रहिवाश्यांना त्रास व व्यत्यय होत असल्याने सदर अनधिकृत बांधकाम तोडण्यात यावे अशी मागणी करणारे निवेदक विनय कॉ.हौ.सो.लि. व इतर रहिवाश्यांनी दि. ०८/०२/२०१३, दि. ११/०२/२०१३ व दि. २८/०२/२०१३ रोजी मा. आयुक्त व मा. उपायुक्त (मु.) ह्यांना भेटून दिली आहेत हे खरे आहे काय? |
| अ) खरे असल्यास सदर निवेदनानुसार अद्याप पर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) सदर इमारत अनधिकृत असल्याने ती तोडण्याची कारवाई केव्हा करण्यात येईल? |
| **२० श्री. अनिल भोसले मा. सदस्य यांनी दि. ३०/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (पश्चिम) सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या बांधलेल्या इमारती संदर्भात महानगरपालिके विरुध्द दाखल केलेले सर्व दावे मा. न्यायालयाने फेटाळल्यानंतर मनपाच्या विधी अधिकारी यांनी सदर अनधिकृत इमारत तोडण्यात यावे असे निर्देश प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.१ ह्यांना मनपा/विधी/२३६/२०१२-१३, दि. ०६/०३/२०१२ रोजी दिले आहेत हे खरे आहे काय? |
| अ) खरे असल्यास मनपाच्या विधी अधिकाऱ्यांच्या निर्देशनानुसार कारवाई न करण्याची कारणे काय आहेत? |
| ब) निर्देशानुसार केव्हा कारवाई करण्यात येईल? |
| **२१ श्री. अनिल भोसले मा. सदस्य यांनी दि. ३०/०३/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) भाईंदर (पश्चिम) सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या बांधलेल्या इमारत झुकल्याने त्यापासून लगतच्या इमारतींना व त्यातील रहिवाश्यांना धोका निर्माण झाल्याने सदर झुकलेल्या इमारती व विकासका विरुध्द कारवाई करण्याची मागणी करणाऱ्या निवेदक विनय कॉ.हौ.सो.लि., भाईंदर ह्या गृहनिर्माण संस्थेने |

दि. ०७/१२/२०१२, दि. ०२/०१/२०१३ व लोकशाही दिन दि. ०४/०२/२०१३ व दि. ०७/०२/२०१३ मध्ये ठेवून ही अद्याप कारवाई झाली नाही हे खरे आहे काय?

अ) कारवाई न करण्याची कारणे काय आहेत?

ब) त्या भागातील रहिवाश्यांना होणारा धोका दूर करण्या संदर्भात केव्हा कारवाई करणार?

**२२ सौ. तारा विनायक घरत मा. सदस्या यांनी दि. ०१/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न**

सद्याच्या प्रभाग क्र. १३ मध्ये असलेल्या विकास आराखड्यातील आरक्षणाबाबत.
१) मिरा भाईंदर शहराच्या विकास आराखड्यात सद्या अस्तित्वात असलेल्या पालिका प्रभाग क्र. १३ च्या हद्दीत किती व कोणकोणती आरक्षणे आहेत? त्याचे क्षेत्रफळ, सर्व्हे क्रमांक काय आहे?

अ) किती व कुठली आरक्षणे विकसीत झालेली आहेत?

ब) किती व कुठल्या आरक्षणांवर अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम झाले आहे?

क) आरक्षणातील कुठल्या अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम व बांधकाम करणाऱ्यांवर कोणती कारवाई आजतागायत झाली आहे?

ड) किती व कोणती आरक्षणे किती टीडीआर देऊन घेतली आहेत?

इ) टीडीआर देऊन मिळालेली आरक्षणाची जागा पालिकेच्या ताब्यात आहे काय? का त्यावर अतिक्रमण झालेली आहेत?

**२३ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. ०१/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न**

१) भाईंदर (प.) भागात सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या दोन मजली इमारत बांधली आहे. ती पाडणेसंदर्भात महापालिकेने केलेल्या कारवाईच्या विरोधात संबंधित मालकाने मा. न्यायालयात दावा क्र. स्पे.सीसुट १४/२०१२ व अपिल क्र.६१/२०१२ दाखल केले होते. ते दावा-अपिल फेटाळण्याने सदर अनधिकृत इमारत तोडण्यात यावी असे निर्देश महापालिका विधी अधिकारी ह्यांनी त्यांचेकडील पत्र क्र. मनपा/विधी/२३६/२०१२-१३, दि. ०६/०६/२०१२ ने प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र.१ ह्यांना दिले होते, हे खरे आहे काय?

अ) असल्यास ९ महिने कालावधी होऊनही अद्यापपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत?

ब) अनधिकृत इमारत पाडण्याची कारवाई केव्हा करण्यात येईल?

**२४ सौ. प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील मा. सदस्या यांनी दि. ०२/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न**

१) भाईंदर (प.) भागात सिटी. सर्व्हे क्र. ५७१ मध्ये अनधिकृतरित्या दोन माळ्यांची इमारत बांधल्याने त्या लगतच्या विनय कॉ.हौ.सो.लि., भाईंदर गृहनिर्माण संस्था व इतर इमारतीतील फ्लॅट धारकांची हवा व उजेड बंद झाल्याने त्या त्रस्त झालेल्या फ्लॅटधारकांनी सदर अनधिकृत बांधलेली इमारत पाडण्यात यावी, अशी मागणी करणारी दि. १४/१२/२०१२, दि. ०२/०२/२०१३, दि. ११/०२/२०१३, दि. २०/०२/२०१३, दि. २८/०२/२०१३ व २४/०३/२०१३ ची निवेदने मा. आयुक्त ह्यांना प्रत्यक्ष भेटून दिली आहेत, हे खरे आहे काय?

अ) असल्यास, त्रस्त झालेल्या नागरीकांच्या निवेदनांवर अद्यापपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत?

ब) कारवाई केव्हा करण्यात येईल?

**२५ डॉ. रमेश धरमचंद जैन मा. सदस्य यांनी दि. ०२/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न**

१) महापालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने मोकळ्या जागेवरील कराची परिणामकारक वसुली होण्याच्या दृष्टीने कोणत्याही जमिन मालक / विकासकाकडून मोकळ्या जागेवरील कराचा भरणा केल्याशिवाय सुधारीत बांधकाम मंजूरी, जोत्याचा दाखला, भोवगटा दाखला देण्यात येवू नये असे निर्देश देणारे आदेश मा. आयुक्त सो. ह्यांनी त्यांचेकडील आदेश क्र. मनपा/१४३/२००८-०९, दि. २२/१२/२००८ व आदेश क्र. मनपा/आयुक्त/२९४/२००९-१०, दि. २३/१२/२००९ ने नगररचना विभागास दिले होते हे खरे आहे का?

अ) असल्यास, दि. ०१/०४/२००८ ते दि. ३१/०३/२०१३ पर्यंत ह्या कालावधीमध्ये नगररचना विभागाने दिलेल्या सुधारीत बांधकाम परवानगी, ज्योत्याचा दाखला,,भोगवटा दाखल ह्यांची तपशिलवार माहिती (मौजे, सर्व्हे क्र., विकासकाचे नाव, मंजुर बांधकाम क्षेत्र, मंजुरी आदेश / दिनांक व भरणा केलेल्या मोकळ्या जागेवरील कराची पावती क्र. व दिनांक) प्रत्येक वर्षवार मिळावी.

ब) मा. आयुक्त सो. ह्यांचे आदेश असताना मोकळ्या जागेवरील कराची पावती वसुली न केल्याने मनपाचे कोट्यावधी रुपयाचे आलेल्या नुकसानीस जबाबदार कोण आहे?

**२६ श्रीम. दिपिका पंकज अरोरा मा. सदस्या यांनी दि. १५/०४/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न**

१) हमारे मिरा भाईंदर मे किटकनाशक छिडकाओ गाडी कितनी है?

अ) यह गाडी एक प्रभाग मे कितनी बार एक सप्ताह मे जानी चाहिए?

ब) अगर यह गाडी महिनों से खराब हो जाए तो हमारे पास दुसरी गाडी का बंदोबस्त है?

क) दुसरी गाडी न होने पर, क्या Alternative पध्दती है छिडकाओं की?

# मा. महासभा

# दि. ०६/०७/२०१३

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा महासभा दि. ०६/०७/२०१३**

आज शनिवार दि. ०६/०७/२०१३ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ४ दि. २७/०६/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | महापौर |
| २) | भोईर राजू यशवंत | सभापती, स्थायी समिती |
| ३) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ४) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| ५) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ६) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ७) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ८) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ९) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १०) | मयेकर सरस्वती रजनीकांत | सदस्या |
| ११) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १२) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १३) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १४) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १५) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १६) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १७) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| १८) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १९) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २०) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २१) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २२) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २३) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २४) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २५) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| २६) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २७) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २८) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| २९) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३०) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३१) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३२) | शरद केशव पाटील | गटनेता, भारतीय जनता पार्टी |
| ३३) | जैन गिता भरत | सदस्या |
| ३४) | जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३५) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३६) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३७) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ३८) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ३९) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४०) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सभापती, महिला व बालकल्याण समिती |

| | | |
|---|---|---|
| ४१) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४२) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४३) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४४) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४५) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ४६) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४७) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ४८) | परमार अनिता भरत | सदस्या |
| ४९) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५०) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५१) | झिनत रऊफ कुरेशी | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५२) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५३) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५४) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५५) | सुजाता रविकांत शिंदे | सदस्या |
| ५६) | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | सदस्य |
| ५७) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५८) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ५९) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ६०) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६१) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ६२) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६३) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६४) | भट्ट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६५) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ६६) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६७) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ६८) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ६९) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७०) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७१) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७२) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७३) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ७४) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ७५) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७६) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ७७) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ७८) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ७९) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| २) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ३) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| ४) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ५) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ६) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ७) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ८) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ९) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| १०) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |

**<u>रजेचा अर्ज –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | उपमहापौर |

| | | |
|---|---|---|
| २) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| ३) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| ४) | मेघना दिपक रावल | सदस्या |

**मा. महापौर :-**

सभेस उपस्थित सर्व सन्मा. सदस्यांचे स्वागत. सदरची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी अशी माझी विनंती आहे. सर्व सन्मा. सदस्य, पत्रकार बंधू व शहरातील नागरीकांना येणाऱ्या आषाढी एकादशीनिमित्त हार्दिक शुभेच्छा. सचिवांनी सभेस सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शनिवार दि. ०६/०७/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०४, दि. २७/०६/२०१३ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. ११ वाजून ३० मिनिटे झालेली आहेत. मागील सभेस मा. महापौरांनी परवानगी दिल्याप्रमाणे मा. नगरसेवक डॉ. राजेंद्र जैन यांच्या प्रश्नाला सुरुवात होत आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहब धन्यवाद। मेरा जो प्रश्न था, वो यह था की, मुझे टॅक्स डिपार्टमेंटद्वारा जो ओ.एल.टी. टॅक्स है, उसके डिफॉल्टर्स कितने थे? और डिफॉल्टर्सपर कितना पेनल्टी लगाया गया? ॲन्ड वाय धिस अमाऊंट हॅज नॉट रिकव्हर्ड सो फार?

**जुबेर इनामदार :-**

सचिव महोदय, मला वाटते मंचावर आज प्रशासनाच्या माध्यमातून एक नवीन अधिकारी आपल्याकडे आलेले आहेत. त्यांची तुम्ही ओळख पटवून द्यावी.

**नगरसचिव :-**

आपल्याकडे शासनाने नियुक्त केलेले ॲडिशनल कमिशनर मा. श्री. भरत शितोळे यांनी आजपासून चार्ज घेतलेला आहे. मा. महापौर पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करीत आहेत. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे.

**राजेंद्र जैन :-**

मेरा पहला सवाल कर संचलक से है की, क्या सह लिस्ट कम्प्लीट है? आपने जो जानकारी दि है, क्या यह पुरी है?

**दिपक सावंत :-**

मा. महापौर महोदयांच्या परवानगीने बोलतो. श्री. राजेंद्र जैन साहेबांनी जी डिफॉल्टरची लिस्ट मागितली होती. ती लिस्ट आहे, त्यावेळेस नगररचना विभागाकडून प्राप्त झालेली जी प्रकरणे होती आणि त्यांचे जे असेसमेंट केले होते, त्यानुसार देण्यात आलेली आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर मॅडम, मैंने बहुत स्पष्ट पुछा है की, ओपन लॅन्ड टॅक्स के हिसाब से जितने डिफॉल्टर बनते है, उनको सुचना मिली, नही मिली यह अलग क्वेशन है। ओपन लॅन्ड टॅक्स के हिसाब से क्या यह लिस्ट कम्प्लीट है अथवा नही?

**दिपक सावंत :-**

आमच्याकडे, टॅक्स असेसर ॲन्ड कलेक्टरकडे जी माहिती आली होती, त्या अनुषंगाने आम्ही जे असेसमेंट केले होते. ज्यांनी पैसे भरले, जे उर्वरीत आहेत, त्या डिफॉल्टरची लिस्ट आपल्याला दिलेली आहे.

**राजेंद्र जैन :-**

ठिक है। मैं आपसे ऐसे पुछता हूँ की, आपको लगता है की, आपके पास जो माहिती आयी है, वो पुरी थी, या अधुरी थी?

**दिपक सावंत :-**

सर, मी आपणाला थोडासा खुलासा करु इच्छितो. ज्यावेळेस २००८ मध्ये महापालिकेने ठराव .........

**राजेंद्र जैन :-**

साहेब, कम समय मे बात करनी है। आपके पास जो माहिती आँयी, वो अधुरी है या पुरी है?

**दिपक सावंत :-**

आमच्याकडे जी माहिती आलेली आहे. ....................

**राजेंद्र जैन :-**

साहेब समझा. लेकिन अधुरी है या पुरी है?

**दिपक सावंत :-**

त्यामध्ये काही लिस्ट नव्हती. काही सी.सी. दिल्याची माहिती नव्हती. ते राहिलेले आहेत.

**राजेंद्र जैन :-**

आप यह मान रहे है की, यह लिस्ट अधुरी है? क्या आपने कोई ऐसा मॅथॅलॉज डेव्हलप किया था, जिसमे आप ऐसी माँग करते है की, ओ.एल. टॅक्स जो है, यह २००८ में जिसका ओ.सी. नहीं हुआ है। पर पहले ग्रामपंचायत से सी.सी. दिया है। १९८५-८६ में भी अगर सी.सी. दिया है, और २००८-०९ में भी अगर उसको ओ.सी. होता है, तो भी एक-दो साल का टॅक्स लगता है। तो आपने ऐसा कोई मेथॉलॉज उनको दिया था की, हमे यह चीज चाहिए। आपने ऐसा कुछ माँगा था, तब आपको मिलेगा। ऐसा आपने माँगा था?

**दिपक सावंत :-**

त्यावेळेस ठराव झाल्यानंतर आम्ही नगररचना विभागाकडे यासंबंधी माहिती मागितली होती. त्यांनी जी माहिती दिली, त्या आधारेच आम्ही असेसमेंट केलेले आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, विषय बहुत गंभीर है। अब इसके अंदर ९४ बिल्डर्स का, ओपन लॅन्ड प्रॉपर्टी होल्डर्स का कुछ ०९ करोड बकाया दिखाया है। जबकी इसके कई अधिक संख्या जाएगी और हमारी रिकव्हरी करीब पचास करोड तक होगी। अगर हम पुरा काम करेंगे तो। दुसरी बात, जो लिस्ट आपने दि है, इसमे भी आपने बिल्डर के आगे उसका अमाऊंट लिख दिया है। जब उस बिल्डर का अमाऊंट इअर वाइज हुआ होगा। एट में हुआ होगा, नाईन में हुआ होगा, टेन में हुआ होगा, इलेव्हन में हुआ होगा तो यह जो अमाऊंट था, क्यों था? और स्टील नॉट रिकव्हर्ड। यह एक ही साल का था अलग-अलग साल का बटा हुआ, आपने टोटल करके बताया।

**दिपक सावंत :-**

हे सर्व २००८ पासून, ज्यावेळेस असेसमेंट झाले तेव्हापासून डिफॉल्टर्स आहेत.

**राजेंद्र जैन :-**

मतलब, यह टोटल है। जब आपका एक से चार साल का डिफॉल्टर चल रहा है। तो टॅक्स लॉ के हिसाब से आपको उसे नोटिस देने का उसका बँक अकाऊंट सिल करने का, उसकी प्रॉपर्टी सीज करने का, उसके सुट डालने का, सब अधिकारी है। आपने इनमें से कौन से अधिकार का प्रयोग किया? अब आपका जो डेटा है, उस डेटा में भी कितने ही प्रॉपर्टी ओनर्स पर आपकी तरफ से कार्यवाही होनी चाहिए थी। आपके द्वारा या आपके ऑफीसर द्वारा। लेकिन डिपार्टमेंट द्वारा एक भी कार्यवाही नही की गयी। हमारे हिसाब से यह पूर्णतः ॲडमिनिस्ट्रेटीव्ह फेल्युअर हुआ है। अगर नही हुआ है तो आप उसको क्लीअर किजीए।

**दिपक सावंत :-**

याच्यामध्ये आपण २००८ मध्ये ठराव केल्यानंतर त्या वर्षापासून असेसमेंट ओपन लॅन्ड करण्याची सुरुवात केली. तर ते करत असताना २००८-०९ ते सन २०१२-१३ या पाच वर्षामध्ये आपण सुरुवात केल्यानंतर साधारणतः नोव्हेंबर २०११ पर्यंत आपण जे व्हॅकेंट लॅन्ड टॅक्स आहे, ते वसुल करत असताना टाऊन प्लानिंग आणि टॅक्स डिपार्टमेंट, जी ओ.सी. दिली जाते, त्यावेळेस को-ऑर्डिनेशन नव्हते, तर आम्ही बसून नोव्हेंबर २०११ पासून याची चेकलिस्ट बनवली. हा टॅक्स भरल्याशिवाय त्याची पुढची ओ.सी. वैगेरे देऊ नये, असा निर्णय झाला. आणि त्यावेळेपासून या निर्णयाची अंमलबजावणी केली जाते. त्यावेळेपासून प्रभावीपणे हा टॅक्स वसुल केला जातो.

**राजेंद्र जैन :-**

२०११-१२, १२-१३ दो साल आपको मिले। इसके अंदर आपको ध्यान में आया की, हमारा पिछला, क्योंकी ओ.एल.डी. टॅक्स कबसे इम्पॉटंट हुआ, जबसे यह ध्यान मे आया की, २००८-०९, ०९-१० और १०-११ में हमने सिर्फ एक करोड रिकव्हरी किया। तीन साल में हमने ओ.एल.टी. टॅक्स में एक करोड रिकव्हरी किया। २०११-१२ में जब श्री. विक्रमकुमार साहब आए, और आपने जब चेकलिस्ट लगाया, यह पैसा आए बिना हम आगे सी.सी. नहीं देंगे। तब आपने दस करोड रुपया रिकव्हर किया। श्री. विक्रम कुमार साहब की तारि‍ नही कर रहा हूँ। उन्होंने जो किया वही कर रहा हूँ। तो यह जो चेकलिस्ट आपके पास आया, उसके बाद २०११-१२, १२-१३ में आपके पास एक डेटा आ गया की, एक चिज हम कही फेल कर रहे है। उस समय हमारे हिसाब से आपको रिकव्हरी करने के लिए कारवाई करने के हिसाब से जो टॅक्स लॉ बोलता है, नोटिस रिकव्हरी, सुट, अटॅचमेंट, यह सब करना चाहिए था। जो अब भी नही हुआ है। पहली बात। दुसरी बात में बोलना चाहता हूँ, जो आपने बोला की, मेरे पास जो डेटा टाऊन प्लानिंग से आया, आपके लेटर मेरे पास है, जो टाऊन प्लानिंग को दिए गए है। १५/०४/२००८ का, २८/०३/२००९ का, १९/०१/२०११ का, २९/०३/२०१३ का, १०/०४/२०१३ का। इतनी बार लेटर, आठ से तेरा, पाच लेटर टॅक्स डिपार्टमेंट से टाऊन प्लानिंग को गए है की, हमे डिपार्टमेंट से टाऊन प्लानिंग को गए है की, हमे ओ.एल.टी. टॅक्स रिकव्हर करने के लिए माहिती चाहिए। आपको माहिती नहीं मिली यह आपने भी बोला। आपने इतना काम किया। लेकिन एक ही म्युनिसिपाल्टी छत के निचे टाऊन प्लानिंग आपको डेटा नहीं देता है। तो उसके अगेन्स आप कुछ कर नही सकते है? आपने कमिशनर को इन्फॉर्म किया था की, हमे डेटा नहीं मिल रहा है, इसलिए हम पचास करोड रुपया वसुल नहीं कर पा रहे है?

**मा. आयुक्त :-**

या विषयामध्ये मी सांगू इच्छितो की, व्हॅकेंट लॅन्ड टॅक्स, हा जो टॅक्स लावण्यात येतो, तो मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १२८ नुसार आपण लावतो. आणि हा टॅक्स लावण्यासाठी मा. महासभेने सन २००८ मध्ये ठराव पारित केला. ठराव पारित केल्यानंतर १ एप्रिल २००८ पासून तो ज्या बिल्डींगना आपण कमेन्समेंट सर्टिफिकेट देणार आहोत, बांधकामाची परवानगी देणार आहोत, त्या विकासकाकडून तो वसुल करण्यांत यावा असा निर्णय झाला. त्यानंतर तत्कालीन मा. आयुक्तांनी एक सुचनापत्र काढले, त्या सुचनेनुसार ज्यांना ओ.सी. दिलेली नसेल, त्यांच्याकडून सुध्दा तो वसुल करण्यांत यावा. आता यामध्ये त्यानंतर त्याची अंमलबजावणी काही संथ गतीने झाली हे मान्य करावे लागेल. तथापी, त्याच्यानंतर जसजसे या कायद्याबद्दल आणि या टॅक्सबद्दल लोकांना, विकासकांना कल्पना आली. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी जाणिवपूर्वक प्रयत्न केले. त्यानंतर त्याची रिकव्हरी वाढायला लागलेली आहे. आणि आता वाढतच आहे. आता आपला जो मुद्दा होता की, जी रिकव्हरी आता शिल्लक राहिलेली आहे. त्याचे आपण काय करणार आहात? किंवा त्याच्यावर अटॅचमेंट, किंवा डिक्री किंवा आणखीन काही कार्यवाही, पनीशमेंट आपण करणार आहोत का? यासाठी मी आपल्याला सांगू इच्छितो की, या प्रकरणाचा मी स्वतः आढावा घेतला. रिकन्सर्नेशन करायला लावले. टाऊन प्लानिंगचे अधिकारी आणि आपल्या निर्धारक आणि कर संकलक यांचे अधिकारी आणि मी स्वतः, आम्ही सर्वांनी बसून असा आढावा घेतला आणि त्या आढाव्यामध्ये २००२ पासून आतापर्यंत आपण ज्यांना-ज्यांना कमेन्समेंट सर्टिफिकेट दिलेले आहे आणि ओ.सी. दिलेले नाही किंवा त्यांनी बांधलेल्या इमारतीवर आपण प्रॉपर्टी टॅक्स लावलेला नाही, अशा सर्व प्रकरणांवर आपण रिकन्सर्नेशन केलेले आहे. तो फिगर वर्क आऊट करण्याचे काम आता पूर्णत्वास आलेले आहे. हा एक भाग झाला. पण आम्ही तिथे थांबलेलो नाही. त्याच्या पलीकडे जाऊन आता त्या विकासकाकडून जोपर्यंत हा निधी वसुल होत नाही, तोपर्यंत त्यांचे पुढचे कुठलेही प्रस्ताव असो, कमेन्समेंट सर्टिफिकेट असो, प्लींथ सर्टिफिकेट असो, ऑक्युपेशन असो किंवा आणखीन कुठलेही काम असो, ते करता येणार नाही. म्हणून आता या वर्षामध्ये त्याचे परिणाम आपल्याला, डिसेंबर पर्यंत निश्चितपणे दिसतील. आणि बहुतांश रक्कम वसुल करण्याच्या स्थितीमध्ये आपण राहू असा मला या परिस्थितीत विश्वास वाटतो. आपला जो मुद्दा होता की, आपण याची कारवाई करायला पाहिजे होती. मी सांगितले त्याप्रमाणे रिकल्सनेशन, दोन डिपार्टमेंटमध्ये को-ऑर्डिनेशन थोडा इश्यु होता. तो मी स्वतः बसून सोडवलेला आहे. आता मी सांगितल्याप्रमाणे जोपर्यंत त्यांची रिकव्हरी होणार नाही, त्या विकासकाच्या इतर कोणत्याही परवानग्या देण्यात येणार नाहीत अशी या प्रसंगी मी आपल्याला ग्वाही देऊ इच्छितो.

**राजेंद्र जैन :-**

सर, धन्यवाद. यह जो मुद्दा है की, कम्युनिकेशन के वजह से नुकसान हुआ। वो नुकसान हमारा करोडो में जा रहा है। यह बात सामने आ रहीं है। मैं आशा करता हूँ की, आगे से ऐसा कम्युनिकेशन लॅप्स नहीं होना चाहिए। दुसरी सबसे बडी बात यह है की .............

**मा. आयुक्त :-**

करोडो का नुकसान हुआ नहीं है। यह डिडक्ट पेमेन्ट है। मतलब, रेकॉर्डपर गलत बात नहीं जानी चाहिए। इसलिए मैं स्पष्ट करना चाहूँगा की, नुकसान नहीं हुआ है। मतलब जो रिकव्हरी होनी थी। वो रिकव्हरी हमको तेजी लाकर करनी है। बाकी जो संभाव्य नुकसान है, या जो रिकव्हरी नही हुयी या विकासक कही चला जाता है, तो वो ना हो। इसलिए वो रेकॉर्डपर गलत नही जाए, इसिलिए मैं बताना चाहता हूँ।

**राजेंद्र जैन :-**

सर आपने नुकसान की, बात की। मैं इसको लास्ट में लेना चाहता था। अब लेता हूँ। टोटल लॉस की जो बात हुयी है, इसके अंदर बात यह है की, हम इसपर पेनल्टी वसुल कर पायेंगे? इंटरेस्ट वसुल कर पायेंगे? और रेस्ट ऑफ स्ट्रक्चर कितने साल से वसुल कर पायेंगे? जब मैंने यह पुछा तो मुझे जवाब दिया गया कि, हम दस-पच्चीस साल वसुल कर पायेंगे? इसके आधार में, इसके सपोर्ट में मुझे जो डॉक्युमेंट दिया गया, वो डॉक्युमेंट पढने पर ऐसा लगता है की, वो आधार सही नही है। आप वसुल नही कर पायेंगे। उसमें लिखा है, जो जजमेंट मुझे दिया गया है, इस जजमेंट मैं जो कारण है, वो कारण अलग है। उसमें उसने बिल्डिंग बनायी और उसने इन्फॉर्म नही किया। इसलिए उसको टॅक्स नहीं लगा। इसलिए उसको रेस्ट्रोस्टाफी लगाया जाए। यह कोर्ट ने कहाँ है। लेकिन यहाँ पर हमने उनको इन्फॉर्म किया है। उनकी कुछ गलती नहीं है। इसलिए यह जजमेंट यहाँ लागू नही होगा। यह हमारा टोटल लॉस में जाएगा। हम टेन इअर से रिकव्हर कर पायेंगे? ट्वेंटी फाइव्ह इअर कर पायेंगे, यह अब तक निश्चित नहीं है। और कही भी मुझे अब तक ऐसा बताया नहीं गया है की, हम पिछले कितने समय की पेनल्टी, कितने सम के ड्युज, अगर हमने नोटीस नही दिया है, कब तक वसुल कर पायेंगे, यह अब भी मुझे कही निश्चित मालुम पडा नहीं है। कृपया इसको स्पष्ट करे। यह कोर्ट का जजमेंट उसमें काम आनेवाला नहीं है।

**मा. आयुक्त :-**

उसमे मैं आपको बताया चाहूँगा की, उसमें जब अपनी नोटिस जाती है, नोटीस जाने के बाद अगर वो विहीत कार्यकाल में महानगरपालिका के पास पैसा जमा नहीं करता है, तो जो तरतुद है, प्रावधान है, उसके

मुताबीक उसपर पेनल्टी की जाएगी। लेकिन इसको अब तक नोटीस गयी नहीं है। उसको हमे पहला चान्स देना पडेगा। वो विदाऊट पेनल्टी रहेगा।

**राजेंद्र जैन :-**

मेरे कहने का यही मतलब है की, अगर हम ऐसा करेंगे तो क्या समजो हमने एक बिल्डर का साल का चार लाख का प्रॉपर्टी टॅक्स बनता था। और हम इस साल का लेंगे, तो क्या पिछले पाच साल का छोड देंगे?

**नगरसचिव :-**

मा. महापौरांनी दहा मिनिटाची वेळ दिली होती.

**मा. आयुक्त :-**

मैंने छोडने की बात नही बोली है।

**राजेंद्र जैन :-**

क्या आप कानूनन उनसे वसुल कर पायेंगे? अगर एक बिल्डर का प्रॉपर्टी टॅक्स चार लाख २००८ के बन रहे है। और हम २०१३ मैं बोलते है की, हमे टॅक्स लेना चाहिए। तो हम २०१३ में नोटिस देंगे। तो २००८, २००९, २०१०, २०११, २०१३ का ले पायेंगे या नहीं?

**मा. आयुक्त :-**

मैं आपको वही बोल रहा हूँ। मैंने आपको पहले जो जवाब दिया, रिकन्सलेशन। हमने पिछले ६ साल की, जबसे अपनी महानगरपालिका अस्तित्व में आयी है, २८ फरवरी २००२ से, तो २८ फरवरी २००२ के बाद मैं बाद मे का पुरा रेकॉर्ड, पुरा रिकन्सलेशन मैंने खुद बैठकर किया है। इसमें २००८ से हमारा निर्णय हुआ। २००८ से आपके बोलने के मुताबिक किसीने पैसा नही भरा है, तो उसका पैसा २००८ से भी रिकव्हर किया जाएगा।

**राजेंद्र जैन :-**

इसमें कोई कानुनी अडचण नहीं आएगी?

**मा. आयुक्त :-**

उसमें कोई कानुनी अडचण नही आएगी।

**नगरसचिव :-**

मॅडम ने दस मिनिट का टाईम दिया था।

**राजेंद्र जैन :-**

मॅडम, वह टॅक्स का बहुत इम्पॉर्टंट इश्यु है। इसके अंदर करोडो का लॉस हो रहा है।

**मा. महापौर :-**

मैंने आपको गये मा. महासभा मैं ही बोला था। आपका विषय लेने का नही था, तो भी मैने लिया। मॅडम आप बैठीए।

**राजेंद्र जैन :-**

मै एक चिज मा. आयुक्त साहबके नजर मे लाना चाहूँगा। मॅडम इसके बाद मै स्टॉप करता हू।

**मा. महापौर :-**

आप अब एक मिनिट मे शॉर्ट मे आपका खत्म किजीए। मुझे दुसरा लेना है।

**राजेंद्र जैन :-**

सर, टॅक्स लॉ के अंदर एक ऑचेन्सीएटीक असेसमेंट बुक नाम की लिख हुई है। जो हर पाच साल बाद स्टॅन्डींग कमिटी के सामने आना चाहिए। मै एक एक्झाम्पल देता हू, अगर मै इनको बोलु की, आज यहॉपर जितने लोग बैठे है, उनके जितने बच्चे है, एक बच्चे के हिसाब से आप सौ रुपये लो और यह आपको एक लिस्ट देंगे की, मैने इतना लिया। आप व्हेरीफाय कैसे करेंगे? कहने का मतलब, कितने लोग है? कितने बच्चे है? कितना एरिया है? कितने बिल्डर है? आपके पास बेसिक डेटा ही नही है। व्ही डोन्ट हॅव एनी अथेन्टीक टेक्स बुक, जिसपर हम नोटीस देकर फायनल करे। ऑथेन्शीक टेक्स बुक आने के बाद मे मालुम पडेगा की, हम कहॉ खडे है। जब तक बुक नही है, हमे कितनी रिकव्हरी करनी चाहिए, कितनी नही होनी चाहिए, कितना आना चाहिए था, उसका ऑडीट आप नही कर सकते है। पिछले इतने सालो से हमारा यह कलेक्शन विदाऊट ऑडीट जा रहा है और ऑडीट डिपार्टमेंट कोई काम नही कर रहा है। मतलब कितना मॅन्युप्युलेशेन, कितना करप्शन हो सकता है। मुझे टाईम कम दिया गया है। बाते बहुत है लेकीन इतने समय से हमारा नुकसान हो रहा है। मै आशा करता हू की, आपके नेतृत्व मे, हम इसको पुरा पुरा फुल्ली रिकव्हरी करेंगे और यह नुकसान नही होने देंगे।

**मा. आयुक्त :-**

पुरी कोशिश की जाएगी।

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, या विषयावर चर्चा करायला दिली नाही. पण आम्हाला याच विषयावर तुमच्या चेंबरमध्ये तुमच्याशी चर्चा करायला वेळ मिळावी अशी विनंती आहे.

**मा. आयुक्त :-**

माझी तयारी आहे.

**नगरसचिव :-**

प्रश्न क्र. ७, श्रीम. गिता भरत जैन यांचा प्रश्न आहे.

**गिता जैन :-**

मा. महापौर मॅडम, सबसे पहले मेरा ऑब्जेक्शन यह है कि, आप जो दस मिनिट का टाइम लिमिट लगाते है, अब उनके प्रश्न आधे है। उनको हम पुरी माहिती नही दे पा रहे है। तो हमे प्रश्न करने क्यों है?

**मा. महापौर :-**

मैने आपको नही दिया था। मैने उनको गये मा. महासभा मे ही बोला था। आपको पुरा चालीस मिनिट है। गये मा. महासभा मे आपका टाइम था। आपने बोला कि, उनको दिजिऐ। तो हर मा. महासभा में अगर उनको ही बात करना है। ही विल नेव्हर फिनीश हिज विषय।

**गिता जैन :-**

मा. महापौर मॅडम, मेरा प्रश्न था कि, महानगरपालिकेने सन २००४ ते २०१२ पर्यंत टंडन असोशिएटला काय काय कामे दिली. जी कामांच्या नावाची माहिती दिली गेली आहे, इज दिस परफेक्ट? पूर्ण आहे का? यात सगळीच कामे आली का?

**सुरेश वाकोडे :-**

त्यामध्ये सगळी कामे आलेली आहेत.

**गिता जैन :-**

श्री. वाकोडे साहेब, अजून एकदा बघून घ्या. सगळी कामे आली का?

**सुरेश वाकोडे :-**

त्यामध्ये सगळी आलेली आहेत.

**गिता जैन :-**

जी.आय.एस. सर्व्हे?

**सुरेश वाकोडे :-**

ते टंडनच्या नावावर नाही.

**गिता जैन :-**

कोणाच्या नावावर आहे.

**सुरेश वाकोडे :-**

सेह निर्माणंच्या नावावर आहे.

**गिता जैन :-**

सेह निर्माण टंडनचे काही सिस्टर ब्रदर असोसिएट, काही आहे का?

**सुरेश वाकोडे :-**

त्यांची कल्पना नाही.

**गिता जैन :-**

साहेब, मला एक विचारायचे आहे. तुम्ही सेहल जी.आय.एस. सर्व्हे दिलेला आहे. मग दुस-या कोणत्याही कंपनीने जी.आय.एस सर्व्हेसाठी डेटा मागितला तर तुम्ही ती माहिती देणार का? तुम्ही सेह निर्माणाला जी कामे दिली आहेत. माझ्या कंपनीने त्या कामासाठी तुमच्याजवळ काहीतरी डेटा मागितला, तर तुम्ही ते आन्सर करणार का?

**दिपक खांबित :-**

होय.

**गिता जैन :-**

म्हणजे तुम्ही मला तुमचा कॉन्फीडेन्शीअल डेटा देणार कोणाचा टॅक्स काय बाकी आहे, कोणाचे काय बाकी आहे, कुठल्याही कंपनीला तुम्ही काहीही देणार?

**दिपक खांबित :-**

होय.

**गिता जैन :-**

कमिशनर साहेब, मला हे जरा योग्य वाटत नाही. तुम्ही खुलासा करा.

**दिपक खांबित :-**

माहिती देणार. जी माहिती आहे ती सगळी ओपन आहे.

**गिता जैन :-**

म्हणजे कुठलीही माणसे, कुठलीही कंपनी तुम्हाला सांगते की, आम्हाला हे-हे काम करायचे आहे आणि ही माहिती द्या. तर तुम्ही देणार.

**दिपक खांबित :-**

देणार.

**गिता जैन :-**

कमिशनर साहेब, to ask the thing what I want is not that सेह निर्माणाला तुम्ही जे दिलेले आहे, त्यानंतर जी.आय.एस. साठी सगळाच पत्रव्यवहार टंडन असोसिएटस ने केलेला आहे. ते का? आणि तुम्ही तो मंजुर का केला? त्यांच्यात अधिकाऱ्यांची सही same person is signing on the voucher. Same person is referring to all the letters. How can it be done? I have the proof.

**मा. आयुक्त :-**

आपण टंडन असोसिएटबद्दल प्रश्न आहे टंडन असोसिएट्स बद्दल आपण जो प्रश्न विचारला त्याबद्दल आपण रिलीवंट प्रश्न..............

**गिता जैन :-**

साहेब, माझा आरोप आहे की, ते कामपण टंडन असोसिएट्सलाच दिले गेलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

मला मान्य आहे आपण आरोप करु शकता त्याबद्दल वाद नाही त्याबद्दल मी आपल्याला काही म्हणणार नाही पण त्यामध्ये जो प्रश्न विचारलेला आहे त्याच्या अनुषंगिक प्रश्न आपण विचारले तर मुद्देसुद उत्तर देता येईल.

**गिता जैन :-**

साहेब, तसे नाही जी. आय. एस. सर्व्हेसाठी जो पत्रव्यवहार झाला आहे तो सगळा टंडन असोसिएट्सच्या हेडखाली झाला आहे आणि तुम्ही त्याला आन्सर देत आहात मग ते कबुल करा की, तुम्ही टंडनला दिले आहे.

**मा. आयुक्त :-**

आपला प्रश्न काय आहे की, टंडन असोसिएट्सला काय काय कामे दिली आणि त्यांना काय काय पेमेंट केलेले आहे त्याची माहिती दिलेली आहे.

**गिता जैन :-**

मग ही माहिती अधुरी का आहे? मला हे का दिलेले नाही? हा पण टंडनचा एक भाग आहे आणि जर नाही तर तुम्ही तो पत्रव्यवहार का कबुल करता?

**मा. आयुक्त :-**

कबुल करण्याचा प्रश्न येत नाही आपल्याला प्रश्न उत्तर दिलेले आहे त्याबाबत जे रिलीव्हंट क्वेश्चन असतील त्याप्रमाणे आपण प्रश्न विचारले तर उत्तर देता येईल आपल्याला स्वतंत्र प्रश्न विचारायचे असतील तर आपल्याला ती मुभा आहे. मा. महापौरांना सुध्दा तसे अधिकार आहेत. स्वतंत्र प्रश्न विचारा त्याचेसुध्दा उत्तर देण्यात येईल.

**गिता जैन :-**

साहेब, तसे नाही. मला जर पहिल्याच प्रश्नाची माहिती पूर्ण देणार नाही तर मी प्रोसीड कशी करणार?

**मा. आयुक्त :-**

आपण पहिला प्रश्न काय विचारलेला आहे?

**गिता जैन :-**

काय काय कामे दिलेली आहेत?

**मा. आयुक्त :-**

आपण पहिला प्रश्न काय विचारला तो मी वाचून दाखवतो. महानगरपालिकेने सन २००४ ते २०१२ या कालावधीत मे. टंडन असोसिएट ह्या तांत्रिक सल्लागारास देण्यात आलेल्या कामाची तपशिलवारा माहिती खालीलप्रमाणे देण्यात यावी, १) कामांची नावे, २) कामाची अंदाजपत्रक रक्कम ३) कार्यादेश तारीख आणि ४) काम पूर्ण करण्याची तारीख त्यानूसार आपल्याला पाणी पुरवठा आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेली आहे त्यामध्ये या चारही मुद्दयांचा समावेश आहे आत्ता या प्रश्नाचे उत्तर आपल्याला या अनुषंगिक असेल तर आपण विचारा.

**गिता जैन :-**

मी तेच विचारते की, पाचवे नावाचा उल्लेख का झालेला नाही?

**मा. आयुक्त :-**

त्या पत्रव्यवहारामध्ये नाही आणि आमची ही माहिती बरोबर आहे हे मी इथे सांगू इच्छितो.

**गिता जैन :-**

पण ती माहिती बरोबर नाही जे पत्रव्यवहार जीआयएस सर्व्हेसाठी झाले आहेत, ते टंडनबरोबर झाले आहेत.

**मा. आयुक्त :-**

आपण आपला आक्षेप नोंदवू शकता की, उत्तर बरोबर नाही तो आक्षेप मा. महापौर ..........

**गिता जैन :-**

पण ते उत्तर बरोबर मिळणार तर मला सर्व्हेबद्दल पूढे काहीतरी विचारायचे असेल तर मी विचारू शकते.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौरांना तो अधिकार आहे की, उत्तर बरोबर नसल्यास ते जी रुलींग देतील त्याप्रमाणे आम्ही पूढची कार्यवाही करतो.

**गिता जैन :-**

मा. महापौर मॅडम, दरवेळी जर अशी खोटी माहिती द्यायची असेल आपली पध्दत इथे काय झालेली आहे, एखाद्या लक्षवेधीला तुम्ही रुलींग देता. ती कामे होत नाहीत आणि ते परत ज खाली आणावे लागते. पूर्ण माहिती देत नाहीत तरीही आपल्याला अधिकाऱ्यांवर काही कार्यवाही करायची नाही जर तेच चालेले आहे तर आम्ही प्रश्न विचारायचे कशाला? म्हणजे आम्ही इथे नोकर म्हणून मेहनत करायची आपण त्यासाठी येतो का? गेल्या सहा महिन्यापासून आपले एकच आहे की, अधिकारी पूर्ण माहिती देत नाहीत किंवा खोटी माहिती देतात मग त्यावर तुम्ही काय ॲक्शन घेता? मला हि माहिती पूर्ण नाही तर मी करु शकते माझ्याकडे लेटरपॅड आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण आपला आक्षेप नोंदवू शकता. आपली कोणती माहिती चुकीची आहे, कोणती माहिती खोटी आहे तो आपला आक्षेप आपण नोंदवू शकता तो अधिकार आपल्याला आहे त्याची शहानिशा होईल आणि त्यामध्ये काही आढळले तर निश्चितपणे त्याप्रमाणे पूढील कार्यवाही करण्यात येईल.

**गिता जैन :-**

साहेब, तीन महिने आधी झाली रुलींग जर अंमलात येत नाही तर याची शहानिशा करुन मला जवाब कधी मिळणार आहे.

**मा. आयुक्त :-**

रुलींग अंमलात येण्याचा प्रश्न आपल्याशी संबंधीत नाही.

**गिता जैन :-**

मग श्रीम. प्रभात ताईंना ते प्रश्न परत का टाकावे लागले?

**मा. आयुक्त :-**

मी स्पष्टपणे सांगु शकतो की, रुलींग या विषयापेक्षा आपण विषयावर बोलले तर जास्त योग्य होईल आपण विषयांतर करत आहात.

**गिता जैन :-**

साहेब, मला पूर्ण जवाब मिळाल्याशिवाय मी पूढे काही विचारणार नाही मला पूर्ण जवाब पाहिजे की, आपण जीआयएस सर्व्हे जर टंडनला दिले नाही तर त्यांच्या प्रत्येक पत्राला आपण आन्सर का दिले आहे?

**मा. आयुक्त :-**

आपल्याला जी माहिती दिली आहे ती बरोबर आहे. आपला आक्षेप आहे त्याची शहानिशा होईल आणि त्यानूसार पूढची कार्यवाही करण्यात येईल यासाठी जे जबाबदार असतील त्यांच्यावरदेखील कार्यवाही करण्यास हयगय होणार नाही.

**गिता जैन :-**

साहेब, आपल्याकडे ती कार्यवाही होत नाही आत्ता मुंबई म्युनीसिपाल्टीचे जे आले त्यामध्ये पन्नास पन्नास लाखांची पेनल्टी दोन कॉन्ट्रॅक्टरना केली. कारण त्यांनी कामे पूर्ण केली नाहीत. प्लस अधिकाऱ्यांना निलंबीत केले कारण त्यांच्या वॉर्डमध्ये ते काम झाले नाही. आपल्याकडे असे कधी काहीच दिसत नाही. आपल्याकडे अधिकारी आपले साहेब आहेत माहिती खोटी द्यायची, अपूर्ण द्यायची तो त्यांचा अधिकार आहे आणि आत्ता ते दिसतेच आहे मला तुमची रुलिंग पाहिजे की, ही खोटी माहिती किंवा अपूर्ण माहिती मला का दिली गेलेली आहे? मग तसेच यायचे तर आम्ही प्रश्न का विचारायचे?

**मा. महापौर :-**

मॅडम, तुमच्याकडे जी माहिती आहे ती द्या.

**गिता जैन :-**

मॅडम, मला पहिजे जीआयएस सर्व्हेची माहिती पाहिजे की, तुम्ही टंडनला दिले आहे की, तुम्ही टंडनला दिले आहे की नाही? जर दिले नाही तर हे पत्रव्यवहार, साईन, वाऊचर हे टंडनचे कशाला? मला अधिकाऱ्यांकडून तो जवाब पाहिजे.

**मा. महापौर :-**

मग तुम्ही काय आहे ते बोला मी त्यांना तुम्हाला जवाब द्यायला सांगते पण तुम्ही काय आहे ते बोलतच नाही आणि त्यांना माहिती नाही की, तुम्हाला काय बोलायचे आहे.

**गिता जैन :-**

पण तुमचा जवाबच मला मिळणार नाही तर मी काय बोलणार? शहानिशा करणार, चौकशी करणार आणि ते कधी होतच नाही.

**मा. आयुक्त :-**

आपण लेखी आक्षेप द्या त्याची मी स्वतः आपल्याला सांगितलेले आहे की, मी स्वतः चौकशी करेन आणिजे जबाबदार असतील....

**गिता जैन :-**

साहेब, मी आत्ताच सांगितले.

**मा. आयुक्त :-**

आपला पुढचा अनुभव काय आहे. मागचा अनुभव काय आहे, दुसऱ्या महापालिकेत काय चालते त्याचा आपल्याशी थेटपणे संबंध पोहोचत नाही. मी आपल्याला हे सांगितले की, आपली जी काही माहिती असेल, ती माहिती द्या. त्या माहितीची मी शहानिशा करतो त्यामध्ये आपल्याला चुकीची माहिती देण्यात आली असेल अपूरी माहिती देण्यात आली असेल त्याची मी स्वतः चौकशी करतो हे मी आपल्याला आश्वस्त केलेले आहे. पण आपला आग्रह आहे की, मला ही का दिली, ती का दिली, ही यादी का दिली नाही. ते आज सांगणे योग्य नाही. या विषयावर प्रश्नाचा जो रोख आहे त्याबद्दल उत्तर दिलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे ते उत्तर पूर्ण आहे. तथापि, आपला आक्षेप असेल तर आपण तो द्यावा. मी स्वतः चौकशी करेन जे कोणी दोषी असतील, त्यांच्यावर आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मॅडमनी प्रश्न विचारलेला आहे आणि तुम्ही त्याचे उत्तर दिलेले आहे. परंतु, मॅडम काहीतरी वेगळेच बोलत आहेत आणि तुम्हीपण समजत नाहीत काहीतरी मिस अंडरस्टँडींग होत आहे. मॅडमला एक्झॅट तुम्हाला काय सांगायचे किंवा काय विचारायचे आहे, तुम्ही डायरेक्ट साहेबांना प्रश्न विचारा परंतु तुम्ही काहीतरी वेगळे बोलता आणि मा. आयुक्त साहेब काहीतरी वेगळे सांगतात.

**मा. महापौर :-**

मी त्यांना तेच सांगते की, तुमच्याकडे जी माहिती आहे ती त्यांना द्या.

**गिता जैन :-**

मी पण त्यांना डायरेक्टच विचारलेले आहे की, या चार कामांशिवाय एक काम अजून दिलेले आहे. ती माहिती त्यात का नाही? मी पण तेच विचारले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्याचे उत्तर मला वाटते दिलेले आहे की, आम्ही दुसरे कुठलेही काम दिलेले नाही.

**गिता जैन :-**

साहेब, उद्या कुणीही बिल्डर तुम्हाला विचारणार की, तुमची ही ही माहिती द्या. आम्हाला सर्व्हे करायचा आहे तुम्ही देणार का?

**मा. आयुक्त :-**

मी परत स्पष्ट करतो, आपल्याकडे जो आक्षेप आहे आपले थोडक्यात असे म्हणणे आहे की, या चार कामांव्यतिरीक्त मे. टंडन असोसिएट्स या कंपनीला दुसरे काम दिलेले आहे का? आम्ही म्हटलेले आहे की, आम्ही चार कामे दिलेली आहेत. तुमचे म्हणणे आहे की, पाचवे कामदेखील त्याला दिलेले आहे, ती माहिती तुम्ही का देत नाहीत. मी आपल्याला हे सांगितले की, पाचव्या कामाची कागदपत्रे माझ्याकडे द्या मी चौकशी करतो अपूरे उत्तर आहे का, चुकीचे उत्तर आहे का? याची छाननी करतो आणि त्यानूसार जबाबदार असतील त्यांच्यावर कार्यवाही करतो.

**गिता जैन :-**

साहेब, तुम्ही तसे केले तरीही मला चालेल पण आत्ता मी प्रोसिड कशी करणार जेव्हा तुम्ही मला पहिल्याच स्टेपवर अपूरी माहिती देता आणि परत डिनाय करता की, आम्ही तसे केलेलेच नाही तर आम्ही काय करायचे? आत्ता मला तुमच्या जीआयएस सर्व्हेचे विचारायचे आहे तुम्ही कबुल करणार का माझे ऐकणार का?

**मा. आयुक्त :-**

तुम्ही माझ्याकडे कागद द्या.

**गिता जैन :-**

आत्ता मला जीआयएस सर्व्हेबद्दल जे काही विचारायचे आहे ते तुम्ही कबुल करणार? मला बोलू देणार?

**मा. आयुक्त :-**

बोलू देण्याचा प्रश्न येत नाही बोलू देण्याचा अधिकार मा. महापौरांचा आहे पण प्रशासनाच्या वतीने मी आपल्याला उत्तर देतो की, आपल्याकडे जी माहिती आहे ती माझ्याकडे द्या. मी त्याची शहानिशा करतो आणि संबंधीत जबाबदार असतील आपली तक्रार जर बरोबर आढळली, तर त्यांच्यावर कार्यवाही करतो.

**गिता जैन :-**

साहेब, मी पण तुम्हाला तेच सांगते की, आत्ता मला ज्या विषयावर बोलायचे आहे, टंडनने घेतलेल्या कामाबद्दल तर तो विषय मा. महापौर मॅडम, आपल्याला कबुल आहे का?

**मा. महापौर :-**

मॅडम, आपके पास जो माहिती है, वो आप साहब को दे दिजीए साहब उसपर डिस्कशन करेंगे की, पाचवा कहाँ से आया, कैसे आया उसकी माहिती निकालकर वो आपको बोल देंगे।

**गिता जैन :-**

ठिक है। तो मै यह पाचवे काम के लिए बोलने के लिए फ्री हू। और पूछने के लिए भी फ्री हूँ।

**मा. महापौर :-**

| ७ | मिरारोड (पूर्व) स्व. बी.के. भगत मार्ग व मंगल नगर क्रॉस रोड वरील चौक | हटकेश्वर महादेव चौक |
| ८ | मोर्वा गांवदेवी मंदीर ते रमेश पाटील घरापर्यंतचा रस्ता | श्री एकविरा आई मार्ग |
| ९ | मोर्वा गाव राधाकृष्ण मंदीर जवळील नाट्यमंच | कै. द्वारकाबाई नामदेव म्हात्रे नाट्यमंच |
| १० | मोर्वा गाव येथे श्री. ओमकारेशवर मंदिर ते पाड्या आळी पर्यंतचा रस्ता | स्व.श्री. जगन शेठ पाटील मार्ग |
| ११ | मोर्वा गाव पोलिस पाटील ते पांडुरंग म्हात्रे घर चौक | गावदेवी मंदिर चौक |
| १२ | भाईदर (पू.) खारीगावातील नाट्यमंच | कै. परशुराम दामोदर पाटील नाट्यमंच |
| १३ | भाईदर (पू.) बी.पी.रोड़ काशिनाथ अपार्टमेंट ते बजरंग बली हॉटेल रस्ता | स्व. दौलतसिंग भाटी मार्ग |
| १४ | मिरारोड (पूर्व) निदा पार्क ते गीतानगर अंतर्गत रस्ता व चौक | अश्रफुल उलेमा चौक व अश्रफुल उलेमा मार्ग |
| १५ | मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. २२१ (बगीचा) | हिंन्दू ह्रदय सम्राट स्व. श्री. बाळासाहेब ठाकरे उद्यान |
| १६ | भाईदर (पूर्व) बंदरवाडी चौक | नाना केरकर चौक |
| १७ | जैसलपार्क एस.टी.पी. समोरील मैदान | प्रा. राम कापसे, फुंटबॉल मैदान |
| १८ | श्री. साफल्य सोसायटी ते गणपती मंदिर पर्यंतचा अंतर्गत रस्ता | श्री गणपती मंदिर मार्ग |
| १९ | शितल दर्शन सोसायटी ते कॉस्मोपॉलिटन शाळेपर्यंतचा अंतर्गत रस्ता | सेंट लॉरेन्स मार्ग |
| २० | शितल स्वर सोसायटी ते आलाप झंकार सोसायटी पर्यंतचा अंतर्गत रस्ता | रहनुमा मदरसा मार्ग |
| २१ | शितल किरण सोसायटी ते शितल सरगम सोसायटी पर्यंतचा अंतर्गत रस्ता | सेंट गेब्रीयल मार्ग |
| २२ | श्री मिरा साफल्य सोसायटी ते मुकूंद पार्क सोसायटी पर्यंता अंतर्गत रस्ता | सावित्रीबाई फुले मार्ग |
| २३ | शितल आर्केड सोसायटी ते नवजीवन शितल आशिष सोसायटी पर्यंतचा अंतर्गत रस्ता | मदर टेरेसा मार्ग |
| २४ | ग्रीन मॅडोज सोसायटी ते सेंट जोसेफ चर्च पर्यंतचा अंतर्गत रस्ता | होली क्रॉस कॉन्व्हेंन्ट स्कुल मार्ग |
| २५ | मिरारोड शांतीनगर से.२ उद्यान | जय सच्चिदानंद उद्यान |
| २६ | रामदेव पार्क रस्त्याकडून आयमाता मंदिराकडून आयडीयल पार्क कडे जाणारा रस्ता | मर्सी जॉन मेमोरीयल रस्ता |
| २७ | सरदार वल्लभाई शाळा केनवुड पार्ककडून रामदेव पार्क ते वागडनगर पर्यंतचा रस्ता | हटकेश्वर महादेव मंदीर मार्ग |
| २८ | वॉर्ड क्र. ३ जैसलपार्क चौपाटी बाल उद्यान | चाचा नेहरू बाल उद्यान |
| २९ | मिरारोड शांतीनगर सेक्टर .३ नाना - नानी पार्क | प्रमूख स्वामी महाराज पार्क |

| | | |
|---|---|---|
| ३० | भाईंदर (प.) वेलकंनी माता चर्चकडे जाणारा रस्ता | माता वेलंकनी चर्च शिरे मार्ग |
| ३१ | मुर्धा खाडी पूल | जिजाऊमाता पुल |
| ३२ | काशिमिरा नीलकमल हॉटेल समोरील चौक | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक |
| ३३ | मिरारोड मनपा हॉस्पीटल व अलहाबाद बॅंकेसमोरील चौक | महात्मा गांधी चौक |
| ३४ | नवघर आरक्षण क्र. ११७ उद्यान | केसरीनाथ पाटील उर्फ बादशाहा उदयान |
| ३५ | भाईंदर (पुर्व) इंद्रलोक फेस - ४ व फेस - ५ समोरील रस्ता | जैन संत गच्छाधिपती प.पु.आचार्य विजय नित्यानंद सुरीश्रवरंजी म.सा.मार्ग |
| ३६ | आर.एन.पी. पार्क गार्डन | आर.एन.पी. पार्क उदयान |
| ३७ | श्रीजी पार्क ते सरोवर अपार्टमेंट आर.एन.पी. पार्क रस्ता | काशि विश्वनाथ मंदीर मार्ग |
| ३८ | जैसल पार्क चौपाटी (धार्मिक कार्यक्रम ठिकाण) | सिध्दी विनायक घाट |
| ३९ | कोठार गल्ली ६० फुटी वरून | स्व. टेरेसा जॉन मेंडोन्सा मार्ग (लेपोरा स्ट्रीट) |
| ४० | भाईंदर (प) स्काय वॉक | स्व. संघवी रिकबचंद ताराजी स्कायवॉक |
| ४१ | मोअर डीपार्टमेंट स्टोर ते गौरव संकल्प रस्ता | शहिद हेंमत करकरे मार्ग |
| ४२ | शांती विदयानगरी ते गौरव संकल्प फेज - ४ रस्ता | शहिद विजय सालसकर मार्ग |
| ४३ | गौरव संकल्प फेज - ४ ते चिचबा देवी पावर हाउुस रस्ता | चिचबादेवी मार्ग |
| ४४ | हरीयस ड्रीम पार्क ते सालासर गार्डन रस्ता | कै. संगितकार श्रीकांत ठाकरे मार्ग |
| ४५ | सग्नाय देवी मंदिर ते गोवला देव मंदिर रस्ता | कै. यशवंत शंकर म्हात्रे मार्ग |
| ४६ | शांती विदयानगरी ते गौरव संकल्प फेज - ४ जॉगर्स पार्क | कै. बाबा आमटे उदयान |
| ४७ | मिरारोड शांतीस्टार कार्यालय समोरील रस्ता | श्री. शामलजी अजमेरा मार्ग |
| ४८ | इंद्रलोक फेज.३ येथील चौक | ओम शांती ओम चौक |
| ४९ | शांतीनगर सेक्टर १० उद्यान | लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल उद्यान |
| ५० | जैसल पार्क जैन मंदिर चौक | महाविर चौक |
| ५१ | नवघर शाळेमागील रस्ता (उद्याना शेजारी) | स्वातंत्र्य सैनिक कै.श्री. गोपाळ दामोदर पाटील मार्ग |
| ५२ | मिरा-रोड कनकीया सरोगी अपार्टमेंट, बेव्हर्ली पार्क चौक | शहीद विजय साळसकर चौक |
| ५३ | भाईंदर (प) स्टेशन रोड ॲनी अपार्टमेंट समोरील चौक | स्व.श्रीमती. ॲनी जोसेफ रॉड्रीक्स चौक |
| ५४ | भाईंदर (पूर्व) चौपाटी विधिवत कार्य इमारत मागील धक्का | सावित्री घाट |
| ५५ | मिरारोड सृष्टी शॉपिंग सेंटर येथील चौक | सृष्टी चौक |
| ५६ | आर.एन.पी. पार्क चिंतामणी ते कोळी नगर रस्ता | कोळीनगर मार्ग |
| ५७ | मिरारोड (पूर्व) चंदन ॲव्हेन्यू ते सनटॉक इमारतीपर्यंतचा रस्ता | बालाजी मार्ग |
| ५८ | मिरारोड (पूर्व) प्रियंका इमारत समोर बालाजी मठच्या बाजूचा चौक | बालाजी चौक |
| ५९ | मिरारोड शांती गार्डन सेक्टर २,६,३ चौक | जय माती दि चौक |
| ६० | भाईंदर (प.)जलाराम नगर व सेकंडरी शाळे मधून भानुशाली समाज मंदिरा पर्यंतचा रस्ता | स्व.हसाबेन मनोहरजी सोनावाला मार्ग |
| ६१ | भाईंदर (प.) भानुशाली समाज हॉल ते अमृतवाणी सत्संग रस्ता | स्व. सुलोचना माधवराव रकवी मार्ग |
| ६२ | मिरारोड (पू.) कनकिया येथील महानगरपालिका इमारत | स्वामी विवेकानंद प्रशासकीय भवन |
| ६३ | भाईंदर (पू.) आरक्षण क्र. १११ मधील उद्यान | रामलिला उद्यान |
| ६४ | भाईंदर (प.) जे.एच.पोद्दार स्कूल मार्गास जोडणारा अंतर्गत रस्ता | श्री नरसिम्हा देव मार्ग |
| ६५ | वॉर्ड क्र. ३१ ऑरेंज़ हॉस्पीटल ते न्यू आयडीयल पार्क | जैनाचार्य अजरामर मार्ग |

| | | |
|---|---|---|
| | महादेव कॉम्प्लेक्स पासून ते गॅलेक्सी हॉस्पीटल रस्ता | |
| ६६ | मिरागाव रंगमंच | हनुमान मंदिर रंगमंच |
| ६७ | प्लीझंट पार्क ते एम.आय.डी.सी राष्ट्रीय महामार्ग पर्यंतचा रस्ता | कै. केशव हरी भोईर मार्ग |
| ६८ | सिल्व्हर पार्क अग्निशमन केंद्र | सिल्व्हर पार्क अग्निशमन केंद्र |
| ६९ | भाईदर (प.) मॅक्सेस मॉल समोरील जॉगर्सपार्क | श्रीम. मायरा गिल्बर्ट मेडोन्सा जॉगर्स पार्क |
| ७० | भाईदंर (पू.) हनुमान नगर मधील वाचनालय | राजा छत्रपती महाराज वाचनालय |
| ७१ | भाईदर (पू.) हनुमान नगर मधील अभ्यासिका | स्वामी विवेकानंद अभ्यासिका |
| ७२ | न्यू गोल्डन नेस्ट चौक ते सेव्हन इलेव्हन हॉस्पीटल रस्ता | श्री. आदेश्वर जैन मंदिर मार्ग |
| ७३ | भाईदर (पू.) तलाव रोड वरील शाळेतील वाचनालय व अभ्यासिका | स्व. आमदार वसंत बापट अभ्यासिका व वाचनालय |
| ७४ | प्लीझंट पार्क, संघवी नगर ते वसुंधरा पर्यंतचा रस्ता | बाप्पा सिताराम मार्ग |
| ७५ | भाईदर (प.) आरक्षण क्र .१०० मधील विरंगुळा केंद्र | विसावा, विरंगुळा केंद्र |
| ७६ | आरक्षण क्र. ३०० मधील मैदान, मिरारोड | नामदार गोखले मैदान |
| ७७ | आरक्षण क्र. ३५५ मधील मैदान, मिरागाव | श्री.यशवंत भोईर मैदान |
| ७८ | आरक्षण क्र. ३२९ उदयान, प्लीझंट पार्क | स्व. जॉन मेंडोन्सा उद्यान |
| ७९ | मिरारोड (पूर्व) रामनगर येथील विरंगुळा केंद्र | मनःशांती विरंगुळा केंद्र |
| ८० | भाईदर (पूर्व) व (पश्चिम) जोडणार रेल्वे खालील फाटका जवळील सबवे | स्वातंत्र्यसैनिक भालचंद्र आनंदराव रकवी सब वे |
| ८१ | भाईदर (पूर्व) व (पश्चिम) जोडणारा जैसल पार्क येथील सबवे | लोकमान्य टिळक सबवे |
| ८२ | मिरारोड रसाझ येथील महानगरपालिका प्रभाग कार्यालय इमारत | सय्यद नजर हुसेन भवन |
| ८३ | नवघर विरंगुळा केंद्र | सावली विरंगुळा केंद्र |
| ८४ | मोर्वा गाव तलाव व उद्यान | गजानन सोन्या पाटील उद्यान |
| ८५ | राई मैदानातील स्टेज | स्व.जयेंद्र जयराम म्हात्रे (मायकल स्टॅन्ड) |
| ८६ | नवघर पोलिस स्टेशन ते देवकी किरण मधील रस्ता | प्रभात पाटील मार्ग |
| ८७ | नवघर नविन तलाव | स्वातंत्र्य सैनिक उदयान |
| ८८ | नवघर स्मशानभुमी | मोक्ष मुक्ती धाम |
| ८९ | माशाचा पाडा येथील शाळा | छत्रपती शाहु महाराजभवन |
| ९० | गोडदेव फाटक रोड वरील साईसागर व गुप्ता भवन मधील रस्ता | संत तुकाराम मार्ग |
| ९१ | आरक्षण क्र. ३६५ मैदान (काशिमिरा) | हिंदु हदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान |
| ९२ | जनता नगर येथे निलकमल अपार्टमेंट ते वेस्टर्न पार्क कडे जाणारा रस्ता | समाजसेवक हाजी गुलाम रसुल पठाण वेस्टर्न पार्क मार्ग |
| ९३ | जनता नगर मनाली व्हीलेज समोरील चौक | मनाली चौक |
| ९४ | ग्रीन व्हीलेज समोरील चौक | स्वामी समर्थ चौक |
| ९५ | निलकमल अपार्टमेंट (जरीमरी मंदीर मार्ग) चौक | शहिद तुकाराम ओंबले चौक |
| ९६ | भाईदर (पूर्व) चौपाटी जवळील लहान मुलांचे उदयान | चाचा नेहरु बाल उदयान |
| ९७ | जैसलपार्क जैनमंदिर ते कपुर टॉवर व चौपाटी पर्यंतचा रस्ता | राणी लक्ष्मीबाई मार्ग |
| ९८ | सेव्हन इलेव्हन हॉस्पीटल ते रामदेव पार्क रस्ता | विर माता मार्ग |
| ९९ | प्लीझंट पार्क (नविन व जुना) मुख्य रस्त्यावरील चौक | कै. रघुनाथ शामजी गायकवाड चौक |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" मधील प्रकरण ११ (२) (१) (अ) अन्वये नावे सदर नामकरणास अंतिम मान्यता देण्यात येत आहे. सदर नामकरण प्रस्ताव बाबत जाहीर वृत्तपत्रात नावे प्रसिध्द करुन पोलिस खाते, पोष्ट खाते व महानगरपालिकेच्या सर्व संबंधित विभागांना नविन नावानूसारच पत्रव्यवहार करण्याबाबत कळविण्यात यावे. सदर नामफलक तयार करुन बसविण्यास येणाऱ्या खर्चास सभा मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २४, सन्मा. सदस्य श्री. सुरेश जे. खंडेलवाल यांचा दिनांक २८/०६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- भाईंदर (प.) प्रभाग समिती क्र. ०१ (जुने नगरपरिषद कार्यालय) समोर भाडेकरु करिता बांधलेल्या इमारती मधील गाळ्यांचे जुने भाडे माफ करणेबाबत.

**सुरेश खंडेलवाल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. ०१ कार्यालयासमोरील (जुने नगरपरिषद कार्यालय) भाडेकरुं करीता बांधलेल्या इमारती मधील गाळयांबाबत मा. महासभा दि. १५/०१/२०१३ ठराव क्र.३३ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. सदर गाळयातील भाडेकरुंची आर्थिक परिस्थिती चांगली नसून सदर गाळेधारक हे सन १९७८ पासून (ग्रामपंचायत काळापासून) भाडेकरु आहेत. मा. महासभा दि. १५/०१/२०१३ ठराव क्र. ३३ मध्ये अंशतः बदल करण्यात येत आहे, त्यानुसार सदर गाळयांचे सन २००२ पासून ते ३१ मार्च २०१३ पर्यंत चे भाडे माफ करण्यात येत आहे. सदर गाळेधारकांकडून दि. ०१ एप्रिल २०१३ पासून ठरविण्यात आलेल्या दरानुसार भाडयाची वसुली करावी.

**सुहास रकवी :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**गीता जैन :-**

मॅडम, मला एक विचारायचे आहे. काही डिटेल्स दिलेली नाही. तुम्ही किती भाडे माफ करता? का करतो? ऑडिट विभागाने माहिती द्यावी की हे योग्य आहे का? आणि तुम्ही काहीच दिले नही की, आपण किती भाडे माफ करता, कधीपासून लावले आहे, काय लावले आहे.

**दिपक खांबित :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, की जे आपले १६ गाळे आहेत. ह्या बाबत भाडे लावण्याचा निर्णय जो आहे तो दि. १५/१/२००३ च्या सभेत मा. महासभेने घेतला होता. त्याच्यात फक्त थकीत भाडे होते ते घेऊ नये असा ठरावामध्ये बदल केला आहे.

**गीता जैन :-**

का केला आहे?

**दिपक खांबित :-**

भाडे घेणे न घेणे, काय भाडे लावणे हा संपूर्ण निर्णय ७९ सेक्शननुसार महानगरपालिकेचा आहे.

**गीता जैन :-**

ठीक आहे. मग आम्हाला तेही माहिती नको का की, आपण किती भाडे माफ करायच आहे का करायच आहे?

**दिपक खांबित :-**

ह्या गाळ्याच जे भाडे आहे. प्रत्येकी २१ रुपये स्क्वेअर फुट म्हणजे तिकडे ४५ ते ५० फुटाचे गाळे आहेत. महिन्याचे ९५० ते १००० रुपये भाडे होते. २००२ पासून एक ते दीड लाखामध्ये प्रत्येकाचे भाडे होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रत्येकी ना.

**गीता जैन :-**

म्हणजे आपल्याला किती लॉस आहे.

**दिपक खांबित :-**

१४ ते १५ लाख रुपये.

**गीता जैन :-**

ते सेन्टर पॉईंट आहे. त्याची इन्कम एवढी नाही का? दे कॅन पे ऑफ द रेन्ट.

**दिपक खांबित :-**

हे जे गाळेधारक आहेत. ते १९७८ पासून तत्कालीन ग्रामपंचायतीपासून हे भाडेकरु आहेत.

**गीता जैन :-**

भाडेकरु आहे ऑनरशिप नाही.

**दिपक खांबित :-**

भाडेकरु आहेत ना. मग त्यांना आपण गाळेपण अजूनपर्यंत भाड्याने दिले आहेत. रस्ते रुंदीकरणामध्ये आपण ह्यांना २००० साली पत्र दिल की, तुमची आम्ही पर्यायी व्यवस्था करु. आणि ते गाळे आपण रस्त्यातून काढले आणि समोरची जागा होती तिकडे बिल्डींग बांधली. त्याप्रमाणे त्याच आपण भाडे ठरवले.

**गीता जैन :-**

पण आपण त्यांना माफ का करायचे? मला ऑडिट विभागाने माहिती द्यावी. वी कॅन डू दॅट. आणि दुसरे आपण का करायचे? दॅट इज द सेंटर पॉईंट त्यांचे तेवढे इन्कम आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

मॅडम, उनकी इन्कम नहीं है। यह मैंने मेरे प्रस्ताव में लिखा है। की, उनकी आर्थिक परिस्थिती ठीक नहीं है। इसलिए उनका निवेदन मैंने प्रस्ताव के थ्रू लाया है। महासभा को ठराव पास करना है, नहीं करना है। यह ठराव के थ्रू दिया गया है। अब रही बात यह ऑडिट डिपार्टमेंट कर सकता है, नहीं कर सकता है। यह अधिकार इसके बाद में इस्तेमाल होगा। मैंने मेरी भावना रखी। क्योंकी आर्थिक परिस्थिती ठीक नहीं है।

**मा. महापौर :-**

गए टाईम हमने जब ठराव किया था, तब सन्मा. संदिप पाटील, मॉरस रॉड्रीक्स, सुहास रकवी और हमारे यहाँ के सदस्य ने बोला उनको भाडा माफ करना है। इसलिए यह हमने "ज" के माध्यम से लिया है।

**गीता जैन :-**

मॅडम, मैं इसके अगेन्स्ट मैं नही हूँ। वो रियली गरीब है, निडी है। आय ॲम नॉट अगेन्स्ट दॅट. मैं माहिती चाह रही हूँ, की आप पुरा माहिती महासभा को दो ना हरबार आधा क्यों?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मॅडम, हा विषय "ज" खाली आलेला आहे. हा विषय गोषवारा प्रशासनाने दिलेला नाही. त्यामुळे माहिती पूर्ण मिळू शकत नाही. जर तुम्हाला ऑब्जेक्शन घ्यायचा असेल तर ऑब्जेक्शन घेऊ शकता किंवा तुम्हाला ठराव मांडायचा असेल तर तुम्ही ठराव मांडू शकता.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सभागृह नेत्याचे म्हणणे बरोबर आहे. तो अधिकार आम्हाला आहे. आम्ही ते नियमानुसार माफ करु शकतो का? त्याची माहिती प्रशासनाने आम्हाला द्यावी. उद्या अडचणीचा विषय आला तर त्याला जबाबदार कोण? मॅडमनी विचारले ते बरोबर आहे. आम्हाला प्रशासनाने माहिती द्यावी. आर्थिक विषयाबद्दल प्रशासनाने सांगावे की, हे योग्य आहे तर आंम्ही त्याच्या विरोधात नाही त्याचे माफ करु नये असे आम्ही बोलत नाही. पण त्याची माहिती प्रशासनाने आम्हाला द्यावी. "ज" खाली प्रस्ताव असला तरी त्याची माहिती प्रशासनाने आम्हाला द्यावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माहिती दिलेली आहे. १९९८ पासून जे गाळेधारक आहेत त्यांनी हे पण सांगितले की, १४-१५ लाख महापालिकेला लॉस होणार आहे. त्यानी सुरवातीपासून माहिती दिलेली आहे. ह्या व्यतिरीक्त अजून कोणती माहिती पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर आम्ही ठरावाला प्रस्तावाच्या माध्यमातुन आमची भावना सभागृहासमोर ठेवली प्रशासनाने लेखापरिक्षकाने त्याचा अहवाल घ्यावा ते त्याच्या अधिकारात आहे. त्यांना योग्य वाटला तर हा ठराव ठेवतील नाहीतर ४५१ खाली विखंडीत करतील.

**शरद पाटील :-**

आम्ही तेच सांगतो ना, मा. महापौर मॅडम ह्या शहरात बरीच मार्केट आहेत आज जर ह्यांना माफ केलं आणि उद्या ते लोक माफ करायला सांगायला आले तर काय करायचे?

**गिता जैन :-**

मॅडम मी फक्त नियम विचारला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मॅडम, खारीगावचा तसाच मच्छीमार्केटचा सेम विषय आहे. तिकडे थकबाकी असल्यामुळे आपण तो ठेक्यावर काढला. परंतु, ठेक्याचे अजून टेंडर आले नाही मग त्यांना पण माफ करा.

**जुबेर इनामदार :-**

रस्ता रुंदीकरणामध्ये त्यांचे गाळे आपण तोडले त्यांना आपण पूर्नःस्थापित केले.

**मा. महापौर :-**

हे रस्ता रुंदीकरणामध्ये केले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आय ॲग्री. पण त्या गाळेधारकांना महानगरपालिकेने गाळे बांधून दिलेले आहेत.

**सुहास रकवी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, १९७८ सालापासून जूनी आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आमचे खारीगाव मच्छीमार्केट ग्रामपंचायती काळापासून आहे.

**सुहास रकवी :-**

संपूर्ण रस्ता रुंदीकरणामध्ये नसल्याने खारीगावचा आहे तो वेगळा प्रश्न आहे आणि हा प्रश्न वेगळा आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्यांना मार्केट महानगरपालिकेने बांधून दिले आहे ना.

**सुहास रकवी :-**

तो अधिकार महासभेला आहे. महासभा त्याला मान्यता देऊ शकते.

**गिता जैन :-**

मॅडम, मी विचारलेला प्रश्न कदाचित ॲट गोईंग द रॉंग वे मला फक्त एवढे विचारायचे आहे की, ते नियमात आहे की नाही?

**रोहिदास पाटील :-**

आर्थिक बाब १०० रु. असली तरी ते नियमात बसले तर ते निघु शकते नसेल तर ते १० लाख असू दे २० लाख असू दे ते निघत नाही त्याची त्यांनी भुमिका स्पष्ट केली का आम्ही सांगतो? असं असेल तर कसं येईल कसं ते?

**सुहास रकवी :-**

काका, ते मॅटर कोर्टात होते.

**रोहिदास पाटील :-**

विषय असा आहे, ही आर्थिक बाब आहे.

**सुहास रकवी :-**

काका, त्या सर्वांनी इथे रिक्वेस्ट केली होती.

**रोहिदास पाटील :-**

हा प्रश्न भावनेचा नाही त्याचा विरोध करायचा नाही. ह्याच्याशी संलग्न अनेक भाडे आहेत. महापालिकेने वेगवेगळ्या ठिकाणी लावलेली भाडी आहेत. मार्केटमध्ये रुम त्यांना परवडत नसतील तर भाडे कमी करायचे आहे की, भाडे माफ करायचे आहे. एक हजार भाडे परवडत नसेल तर सातशे करा असा एक विषय येईल. माफच करायला सांगितले तर १५ लाख माफ करायचे कायद्याने सभागृह बांधील होईल का ? हा सभागृहाने ठराव केल्यानंतर...............

**सुहास रकवी :-**

काका, गेल्यावेळेला मॉरस शेठनी तोच विषय मांडला होता.

**गिता जैन :-**

मॉरस शेठनी विषय मांडला म्हणून आपल्याला नियमात बसते की नाही ते विचारायचे नाही का ?

**सुहास रकवी :-**

ठराव नियमात बसतो त्यानुसार प्रस्ताव आलेला आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही ह्याला विरोध करत नाही. तर प्रशासनाने ह्याची फक्त माहिती द्यावी. की, हे नियमात बसते आणि माफ करू शकतो. आम्हाला त्याचा काहीच प्रश्न येत नाही.

**रोहिदास पाटील :-**

'ज' च्या प्रस्तावात करू शकतो का ? नाही करू शकत ह्याची सभागृहाला माहिती द्या.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, प्रस्ताव मांडला आहे. महासभेला अधिकार आहे. त्यांनी ठरावाच्या माध्यमातून सभागृहासमोर प्रस्ताव मांडला आहे.

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त महोदय, अधिकार महासभाका है। लेकिन जिस आधार पे उनकी आर्थिक स्थिती आप निश्चित करोंगे वही आधार पे और जनता मॉंग करेगी तो महासभा उनको दे पायेगी यह विचार करना जरूरी है।

**जुबेर इनामदार :-**

ठराव करायचा की नाही तो नियमात आहे की नाही हे विचारायचे आहे की, तूम्ही आर्थिक बाबीचे आपण मा. आयुक्तांना सांगितले आहे. ज्यांनी ठराव मांडला त्यांनी तेच सांगितले की, तो मा. आयुक्तांचा अधिकार आहे.

**संदिप पाटील :-**

मा. महापौर मॅडम त्यांनी उत्तर द्यावे.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य साहेब आम्ही मा. आयुक्तांना तेच विचारतो. मा. आयुक्तांनी त्याचे उत्तर द्यावे दोन ओळीचे उत्तर आहे. आम्ही कूठे जास्त काय मागतो.

**संदिप पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मला बोलायचे आहे. हा विषय मी दोन तीन महासभे अगोदर काढला होता. की त्याचे भाडे माफ करा. कारण त्यांची तेवढी कॅपेसिटी नाही. आज तुम्ही एकदम आठ ते दहा वर्षाचे भाडे त्या गरिबावर लावले आहेत. तिथे ४००-५०० रूपयाचा धंदा होतो . त्यामध्ये ते दीड लाख रूपये भाडे भरणार आहेत का ? नाही जे जुने भाडे आहे ते माफ करून त्यांना एप्रिल २०१३ पासून त्याला मान्यता द्या. ठराव करायची काही गरज नाही जे गरीब आहेत त्यांच्यावर कशाला अन्याय करता.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आणि संदिप पाटील साहेब आम्ही कोणावर अन्याय करीत नाही. आम्ही प्रशासनाला विचारतो त्यानी त्याचे उत्तर द्यावे . आपण समजत नाही तो आर्थिक बाबीचा विषय आहे. प्रशासन उत्तर का देत नाही. मॅडम आपण सांगा. मा. आयुक्त साहेब आपण उत्तर द्या. आणि जर नियमात बसत असेल तर माफ करा आम्ही कूठे नाही बोलतो.

**गिता जैन :-**

सर, उत्तर देताना अजून सांगा की, आम्ही कूठे रिकमंन्ड केल की, हे पण भाडे भरू शकत नाही. त्यांना माफ करा तर ते होणार का ? तेवढा खुलासा पाहिजे.

**मा. महापौर :-**

ठराव आलेला आहे. आपण मतदानाला घेऊ. नंतर प्रशासनाला जसे करायचे असेल तसे करतील.

**गिता जैन :-**

मॅडम, मी परत परत सांगते आम्हाला त्या गरिबांच्या विरूध्द we have not against that मला फक्त एक नियम माहित पाहिजे. ऑडिटरने उठून सांगायचे की. हे नियमात बसते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण ज खाली हा प्रस्ताव आणलेला आहे. सन्मा. सुरेश खंण्डेलवाल आणि जुबेर इनामदारानी ह्यांनी ह्या प्रस्तावावर ठराव पण मांडलेला आहे. जर समजा ह्यांना काय विरोध असेल तर ह्यांनी वेगळा ठराव मांडावा हा ठराव आपण बहुमताने मंजूर करावा.

**निलम ढवण :-**

सभागृह नेते ठराव वगैरे मांडून आपआपसात वाद निर्माण करु नका. ह्या विषयावर ठराव मांडण्यापेक्षा जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याला एका वाक्यात उत्तर द्या. आणि हा विषय मिटवून टाका. वाद घालण्यापेक्षा त्याला उत्तर दिले. त्याची माहिती सभागृहातील सर्व सन्मा. नगरसेवकांना मिळेल आणि वेळ पण वाया जाणार नाही.

**मा. आयुक्त :-**

ह्यामध्ये मी स्पष्ट करु इच्छितो की हा गोषवारा प्रशासनाने दिलेला नाही दुसरा मुद्दा हा "ज" खाली प्रस्ताव आहे. "ज" खाली प्रस्ताव सभागृहाचा अधिकार आहे तो मान्य करावा, अमान्य करावा, दुरुस्ती सुचवाव्या त्यामध्ये आपला जो मुद्दा आहे की तो प्रस्ताव मंजूर होण्यापूर्वी हा कायदेशीर होईल का? तो ठराव सभागृहाची मालमत्ता झालेली आहे. त्याच्यावर आपल्याला निर्णय घ्यायचा आहे. तो कायदेशीर होईल की नाही हे सांगण्याचा मला आज अधिकार नाही परंतु ठराव मंजूर केल्यानंतर तो कायदेशीर आहे का? आर्थिक बाबीशी आहे का? सगळ्या अटीशर्ती पूर्ण होतील का? हे करुनच त्याची अंमलबजावणी करावी की नाही करावी हा निर्णय घेण्यात येईल माझ एवढच म्हणण आहे की आपल्या सभागृहाची मालमत्ता झालेली आहे. त्याच्यावर अगोदर निर्णय होणे आवश्यक आहे आणि तो निर्णय झाल्यानंतर मग त्याची कायदेशीर अंमलबजावणीमध्ये जसे मी थोड्या वेळापूर्वी सांगितले विजेच्या पूरवठ्यासंबंधी तो देखील ठराव ह्या मा. महासभेनेच केलेला होता तो शासनाने आखून दिलेल्या निकषात बसला नाही म्हणून आम्ही शासनाकडे विखंडीत करण्यास पाठवलेला आहे. ह्याचा अर्थ हा नाही की, हा ठराव मी विखंडीत करायला पाठवेन त्याची अंमलबजावणीची शक्यता त्यामुळे उद्‌भवणाऱ्या आर्थिक बाबीशी निगडीत बाबी ह्या सगळ्याचा अभ्यास करुन नंतर ह्याचा निर्णय घेण्यात येईल. तो पर्यंत हा प्रश्न इथे गैरलागू ठरतो की तशी तरतूद आहे का? किंवा दुसऱ्या ह्याना तुम्ही तशी मान्यता द्याल का? हे सगळे मुद्दे गैरलागू आहेत. मा. महासभेचा ठराव आहे.

मा. महासभेचा अधिकार आहे. मा. महासभेने निर्णय घ्यावा. त्याच्या अंमलबजावणी बाबत उचित ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन तपासणी करुन आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

**गिता जैन :-**

सर, इन दॅट केस आय सजेस्ट आपण हा ठराव पूढच्या सभेत घेऊ. तुम्ही आम्हाला पूर्ण माहिती द्या कायदा सांगा.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ह्या विषयाबाबत कायदेशीररित्या कोणतीही अडचण आली त्याला भारतीय जनता पार्टी जबाबदार राहणार नाही. बाकी सगळ ठिक आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २४ :-**

सन्मा. सदस्य श्री. सुरेश जे. खंडेलवाल यांचा दिनांक २८/०६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- भाईंदर (प.) प्रभाग समिती क्र. ०१ (जुने नगरपरिषद कार्यालय) समोर भाडेकरु करिता बांधलेल्या इमारती मधील गाळ्यांचे जुने भाडे माफ करणेबाबत.

**ठराव क्र. २४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. ०१ कार्यालयासमोरील (जुने नगरपरिषद कार्यालय) भाडेकरुं करीता बांधलेल्या इमारती मधील गाळयांबाबत मा. महासभा दि. १५/०१/२०१३ ठराव क्र.३३ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. सदर गाळयातील भाडेकरुंची आर्थिक परिस्थिती चांगली नसून सदर गाळेधारक हे सन १९७८ पासून (ग्रामपंचायत काळापासून) भाडेकरु आहेत. मा. महासभा दि. १५/०१/२०१३ ठराव क्र. ३३ मध्ये अंशतः बदल करण्यात येत आहे, त्यानुसार सदर गाळयांचे सन २००२ पासून ते ३१ मार्च २०१३ पर्यंत चे भाडे माफ करण्यात येत आहे. सदर गाळेधारकांकडून दि. ०१ एप्रिल २०१३ पासून ठरविण्यात आलेल्या दरानुसार भाडयाची वसुली करावी.

**सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदन :- श्री. सुहास रकवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २५, सन्मा. सदस्य श्री. प्रमोद जयराम सामंत यांचा दिनांक २८/०६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मिरारोड, बंदरवाडी व काशिमिरा या तीन स्मशानाकरीता महानगरपालिकेमार्फत लाकडे पुरवठा करणेबाबत.

**प्रमोद सामंत :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या १४ स्मशानभुमीपैकी मिरारोड, बंदरवाडी काशिमिरा येथील स्मशानभुमी वगळता ११ स्मशान भुमीत महानगरपालिकेमार्फत ठेकेदार नियुक्त करुन जळाऊ लाकडे पुरवठा करण्यात येतात. जळाऊ लाकडे मोफत पुरवठा करण्याचे महानगरपालिकेचे धोरण असुन मा.महासभा दि.२१/१०/२००८ ठराव क्रमांक ५५ अन्वये ज्यांना जळाऊ लाकडाचे पैसे दयावयाचे आहेत त्यांच्याकडुन रु. १०००/- रक्कम महानगरपालिका जमा करुन घेते. तथापी मिरारोड, बंदरवाडी व काशिमिरा स्मशानभुमीत ज्या खाजगी संस्थामार्फत जळाऊ लाकडे पुरविण्यात येतात त्यांच्याकडुन रु. १,०००/- पेक्षा जादा रक्कम संबधिताकडुन घेण्यात येत असल्याच्या तसेच लाकडे ओली असणे, लाकडाचा साठा नसणे अशा तक्रारी येत आहेत. त्यामुळे सदर तीन स्मशानभुमीत देखिल महानगरपालिकेमार्फतच जळाऊ लाकडे पुरवठा करण्यात यावीत.

**सुहास रकवी :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**मा. आयुक्त :-**

ह्या ठरावामध्ये मी भाष्य करत नाही. परंतू सभागृहाला माझ्या स्वतःच्या वतीने अवगत करु इच्छितो हा विषय निघाला म्हणून की, आपल्या महानगरपालिकेतर्फे फक्त एकच स्मशान भूमीमध्ये सी.एन.जी. वर चालणारी आपली एक दहन यंत्र आहे. पर्यावरणाची हानी होऊ नये म्हणून आपण ह्यावेळेस कमीत कमी ती सुविधा आपण चार ठिकाणी म्हणजे पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर ह्या चार ठिकाणी जिथे शक्य होईल तिथे

करायचा माझा प्रयत्न आहे. ह्यासाठी निधीची कमतरता पडत असेल त्यासाठी रिॲप्रोप्रिएशनसाठी मा. महासभेपूढे माझी येण्याची तयारी आहे.

**प्रकरण क्र. २५ :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रमोद जयराम सामंत यांचा दिनांक २८/०६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मिरारोड, बंदरवाडी व काशिमिरा या तीन स्मशानाकरीता महानगरपालिकेमार्फत लाकडे पुरवठा करणेबाबत.

**ठराव क्र. २५ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या १४ स्मशानभुमीपैकी मिरारोड, बंदरवाडी काशिमिरा येथील स्मशानभुमी वगळता ११ स्मशान भुमीत महानगरपालिकेमार्फत ठेकेदार नियुक्त करुन जळाऊ लाकडे पुरवठा करण्यात येतात. जळाऊ लाकडे मोफत पुरवठा करण्याचे महानगरपालिकेचे धोरण असुन मा.महासभा दि.२१/१०/२००८ ठराव क्रमांक ५५ अन्वये ज्यांना जळाऊ लाकडाचे पैसे दयावयाचे आहेत त्यांच्याकडुन रु. १०००/- रक्कम महानगरपालिका जमा करुन घेते. तथापी मिरारोड, बंदरवाडी व काशिमिरा स्मशानभुमीत ज्या खाजगी संस्थामार्फत जळाऊ लाकडे पुरविण्यात येतात त्यांच्याकडुन रु. १,०००/- पेक्षा जादा रक्कम संबधिताकडुन घेण्यात येत असल्याच्या तसेच लाकडे ओली असणे, लाकडाचा साठा नसणे अशा तक्रारी येत आहेत. त्यामुळे सदर तीन स्मशानभुमीत देखिल महानगरपालिकेमार्फतच जळाऊ लाकडे पुरवठा करण्यात यावीत.

**सुचक :- श्री. प्रमोद सामंत** **अनुमोदन :- श्री. सुहास रकवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २६, सन्मा. सभागृह नेते श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २९/०६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रहिवाश्यांना एम.एम.आर.डी.ए.च्या रेंटल हाऊसिंग प्रकल्पात तात्पुरते अल्पदरात भाड्याने घर उपलब्ध करुन देणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महनगरपालिका क्षेत्रात मोठया प्रमाणावर धोकादायक इमारती असून सदर इमारतीत गरीब लोक राहतात. सदर रहीवाशांकडे पर्यायी व्यवस्था तसेच भाडयाने घर घेण्याची परिस्थिती नसल्याने धोकादायक इमारतीत जीवावर उदार होऊन राहतात. पावसाळी दिवसात धोकादायक इमारतीचे भाग कोसळून जिवित हानी सुध्दा होत असते, अशा घटना वारंवार घडत आहेत. महानगरपालिकेकडे संक्रमण शिबिराची देखिल व्यवस्था नाही. विदयमान इमारतीचे चटईक्षेत्र व संस्थाच्या नियमामधील तरतूद यांचा मेळ घालून नविन पुर्नविकास करणे इमारत धारकांना तसेच गृहनिर्माण संस्थाना, विकासकांना करणे शक्य होत नाही. वाढीव चटई क्षेत्राचा प्रस्ताव देखिल शासनाकडे प्रलंबित असल्याने पुर्नबांधणीस अडथळे निर्माण होत आहेत, त्यामुळे धोकादायक इमारतीमधील रहीवाशी जीव मुठीत धरुन राहत आहेत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए कडील रेन्टल हाऊसिंग चे प्रकल्प सुरु असून त्यामधून एम.एम.आर.डी.ए.कडे मोठया प्रमाणावर भाडयाची घरे उपलब्ध होणार आहेत. सदर भाडयाची घरे उपलब्ध करून देण्याबाबत मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री महाराष्ट्र शासन यांच्याकडे आमदार मा. श्री. गिल्बर्ट मेंडोन्सा व महापौर मा. सौ.कॅटलिन परेरा यांनी पत्र पाठवून मागणी केलेली आहे. तसेच सदर कामाकरीता खासदार मा. श्री. संजीव नाईक व आमदार मा. श्री. मुझफ्फर हुसेन देखिल शासन स्तरावर पाठपुरावा करीत आहेत. पालकमंत्री मा. गणेश नाईक सो. यांनी त्यांच्या बंगल्यातील बैठकीत सुध्दा याबाबत निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतीमधील रहीवाशांना एम.एम.आर.डी.ए. च्या रेन्टल हाऊसिंग प्रकल्पात भाडे तत्वावर तयार झालेली घरे अल्पशा भाडयाने उपलब्ध करुन देण्याकरीता महानगरपालिकेने प्रस्ताव शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. सदर प्रस्तावाबाबत मा. आयुक्त यांनी व्यक्तीशः पाठपुरावा करुन प्रस्ताव शासनाकडून मंजूर करुन घ्यावा.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमताने मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २६ :-**

सन्मा. सभागृह नेते श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक २९/०६/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रहिवाश्यांना एम.एम.आर.डी.ए.च्या रेंटल हाऊसिंग प्रकल्पात तात्पुरते अल्पदरात भाड्याने घर उपलब्ध करुन देणेबाबत.

**ठराव क्र. २६ :-**

मिरा-भाईंदर महनगरपालिका क्षेत्रात मोठया प्रमाणावर धोकादायक इमारती असून सदर इमारतीत गरीब लोक राहतात. सदर रहीवाशांकडे पर्यायी व्यवस्था तसेच भाडयाने घर घेण्याची परिस्थिती नसल्याने धोकादायक इमारतीत जीवावर उदार होऊन राहतात. पावसाळी दिवसात धोकादायक इमारतीचे भाग कोसळून जिवित हानी सुध्दा होत असते, अशा घटना वारंवार घडत आहेत. महानगरपालिकेकडे संक्रमण शिबिराची देखिल व्यवस्था नाही. विदयमान इमारतीचे चटईक्षेत्र व संस्थाच्या नियमामधील तरतूद यांचा मेळ घालून नविन पुर्नविकास करणे इमारत धारकांना तसेच गृहनिर्माण संस्थाना, विकासकांना करणे शक्य होत नाही. वाढीव चटई क्षेत्राचा प्रस्ताव देखिल शासनाकडे प्रलंबित असल्याने पुर्नबांधणीस अडथळे निर्माण होत आहेत, त्यामुळे धोकादायक इमारतीमधील रहीवाशी जीव मुठीत धरुन राहत आहेत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एम.एम.आर.डी.ए कडील रेन्टल हाऊसिंग चे प्रकल्प सुरु असून त्यामधून एम.एम.आर.डी.ए.कडे मोठया प्रमाणावर भाडयाची घरे उपलब्ध होणार आहेत. सदर भाडयाची घरे उपलब्ध करून देण्याबाबत मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री महाराष्ट्र शासन यांच्याकडे आमदार मा. श्री. गिल्बर्ट मेंडोन्सा व महापौर मा. सौ.कॅटलिन परेरा यांनी पत्र पाठवून मागणी केलेली आहे. तसेच सदर कामाकरीता खासदार मा. श्री. संजीव नाईक व आमदार मा. श्री. मुझफ्फर हुसेन देखिल शासन स्तरावर पाठपुरावा करीत आहेत. पालकमंत्री मा. गणेश नाईक सो. यांनी त्यांच्या बंगल्यातील बैठकीत सुध्दा याबाबत निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतीमधील रहीवाशांना एम.एम.आर.डी.ए. च्या रेन्टल हाऊसिंग प्रकल्पात भाडे तत्वावर तयार झालेली घरे अल्पशा भाडयाने उपलब्ध करुन देण्याकरीता महानगरपालिकेने प्रस्ताव शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. सदर प्रस्तावाबाबत मा. आयुक्त यांनी व्यक्तीशः पाठपुरावा करुन प्रस्ताव शासनाकडून मंजूर करुन घ्यावा.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील** **अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २७ , सन्मा. सदस्या प्रभात प्रकाश पाटील यांचा दिनांक ०२/०७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- आर.सी.एच. खालील लिंकवर्कर्सच्या मानधनाबाबत.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम मागच्या टर्ममध्ये लक्षवेधी द्वारे हा मुद्दा आणलेला तेव्हा आपण ह्या सदनाचे सभासद होतात. आता हा मुद्दा आपल्या समोर आणताना एक महिला महापौर म्हणून आपण तो सामावून घेतला त्याबद्दल आपले आभार.

मिरा भाईंदर महानगरपालिकेत आर.सी.एच. कार्यक्रम २००६-०७ या वर्षापासून राबविण्यात येतो. सदर कार्यक्रमांतर्गत १३० लिंक वर्कस नेमण्यासाठी मा. महासभेने मान्यता दिलेली आहे. शासन निर्णयाप्रमाणे सद्यस्थितीत लिंक वर्कर्सना मासिक ५०० रु. मानधन दिले जाते. तसेच महानगरपालिकेतर्फे त्यांना सन २००९ पासून मासिक २०० रु. अतिरिक्त मानधन दिले जाते. अशाप्रकारे लिंक वर्कर्सना सद्यस्थितीत मासिक ७०० रु. मानधन देण्यात येते. सदर लिंक वर्कर्सच्या मानधनात वाढ करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रशासनाने अर्थसंकल्पामध्ये तरतूदही केलेली आहे. तरी सदर लिंक वर्कर्सना महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ करुन मासिक ३००० रु. देण्यास ही महासभा मंजूरी देत आहे. शासन निर्णयाचे मासिक ५०० रु. मानधन निर्णयानुसार नेहमीप्रमाणे निर्णयानुसार अदा करण्यात यावे. एकूण ३५०० रु. इतकी रक्कम असेल.

तसेच शासन निर्देशान्वये सदर लिंक वर्कर्सची नेमणूक व मानधन देण्यात येत असल्यामुळे, शासनाने लिंक वर्कर्सच्या नेमणुकीच्या अटी-शर्तीत काही बदल केल्यास वा त्यांच्या मानधन देण्याबाबत काही निर्देश दिल्यास त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करण्यास, ही महासभा मंजुरी देत आहे.

**अनिता पाटील :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २७ :-**

सन्मा. सदस्या प्रभात प्रकाश पाटील यांचा दिनांक ०२/०७/२०१३ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- आर.सी.एच. खालील लिंकवर्कर्सच्या मानधनाबाबत.

**ठराव क्र. २७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेत आर.सी.एच. कार्यक्रम २००६-०७ या वर्षापासून राबविण्यात येतो. सदर कार्यक्रमांतर्गत १३० लिंक वर्कस नेमण्यासाठी मा. महासभेने मान्यता दिलेली आहे. शासन निर्णयाप्रमाणे सद्यस्थितीत लिंक वर्कर्सना मासिक ५०० रु. मानधन दिले जाते. तसेच महानगरपालिकेतर्फे त्यांना सन २००९ पासून मासिक २०० रु. अतिरिक्त मानधन दिले जाते. अशाप्रकारे लिंक वर्कर्सना सद्यस्थितीत मासिक ७०० रु. मानधन देण्यात येते. सदर लिंक वर्कर्सच्या मानधनात वाढ करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रशासनाने अर्थसंकल्पामध्ये तरतूदही केलेली आहे. तरी सदर लिंक वर्कर्सना महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ करुन मासिक ३००० रु. देण्यास ही महासभा मंजूरी देत आहे. शासन निर्णयाचे मासिक ५०० रु. मानधन निर्णयानुसार नेहमीप्रमाणे निर्णयानुसार अदा करण्यात यावे. एकूण ३५०० रु. इतकी रक्कम असेल.

तसेच शासन निर्देशान्वये सदर लिंक वर्कर्सची नेमणूक व मानधन देण्यात येत असल्यामुळे, शासनाने लिंक वर्कर्सच्या नेमणुकीच्या अटी-शर्तीत काही बदल केल्यास वा त्यांच्या मानधन देण्याबाबत काही निर्देश दिल्यास त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करण्यास, ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- सौ. प्रभात पाटील** **अनुमोदन :- सौ. अनिता पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

उत्तराखंड राज्यामध्ये मागील महिन्यामध्ये जोरदार पर्जन्यवृष्टी होऊन आपल्या विवीध धार्मिक स्थळांचे फार मोठे नुकसान झालेले आहे. तसेच या ढगफुटीमध्ये हजारो नागरीकांना / भावीकांना आपला प्राण गमवावा लागला असून अजूनही काही नागरीक / भावीक बेपत्ता आहेत. या नैसर्गिक आपत्तीमुळे पीडीतांचे व देशाचे लवकर भरुन न येणारे नुकसान झालेले आहे. तसेच आपल्या जवानांनी अशा कठीण प्रसंगी, ऊन-पावसाची पर्वा न करता स्वतःच्या प्राणांची बाजी लावून अनेक नागरीकांचे प्राण वाचविले हेच कार्य करताना आपल्या काही जवानांना प्राण गमवावे लागले आहेत. या सर्वांच्या दुःखामध्ये ही महासभा सहभागी आहे.

**नगरसचिव :-**

सर्वांनी दोन मिनिट उभे राहून मृतात्म्यास शांती वाहायची आहे.

**मा. महापौर :-**

सभा संपली असे मी जाहिर करते.

**सभा संपल्याची वेळ - दु. ०१.३० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१०/२०१३.

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ४१ :-** **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे.**

**निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे**

**१) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद**
**२) श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो**
**३) श्री. प्रमोद जयराम सामंत**
**४) श्री. राजेश शंकर वेतोसकर**
**५) डॉ. राजेंद्र जैन**
**६) डॉ. रमेश जैन**
**७) श्री. संदिप मोहन पाटील**
**८) श्री. प्रविण मोरेश्वर पाटील**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीवरील सदस्यांपैकी निम्मे आठ सदस्य माहे नोव्हेंबर २०१३ च्या पहिल्या तारखेस निवृत्त होत आहेत.

निम्मे आठ सदस्य निवृत्त करताना भारतीय जनता पार्टी २, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस २ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी २ व शिवसेना २ असे एकुण आठ सदस्य निवृत्त झालेले आहेत. मा. उपसचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण २००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवी-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे. जेणेकरुन बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याबाबत तरतुदीची पुर्तता होऊ शकेल. मात्र अशा वेळेस पूर्वीच्या तुलनेने पक्षाच्या/गटाच्या तौलानिक संख्येत बदल झालेला नसावा.

निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नविन आठ सदस्यांची २ वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करणेस शिफारस आहे.

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/१०/२०१३.

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ४२ :-** **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरविता येईल अशारितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्त १५ व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद आहे.

प्रकरण २ चा नियम ३(३) अन्वये वृक्षप्राधिकरणेस ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींना वृक्षप्राधिकरणाचे सदस्य म्हणून स्विकृत (नामनिर्देशित) करुन घेता येईल. परंतु, अशा स्विकृत सदस्यांची संख्या ३ पेक्षा अधिक असता कामा नये. हे सदस्य वृक्षप्राधिकरण समिती ठरविल अशारितीने व मुदतीसाठी स्विकृत करण्यात आले पाहिजे.

तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ८ जानेवारी १९९६ मध्ये सुधारणा केल्यानुसार या वृक्षप्राधिकरणाचा सभापती मा. आयुक्त हे असतील.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने यापूर्वी ९ पालिका सदस्य ३ स्विकृत सदस्य व मा. आयुक्त पदसिध्द अध्यक्ष अशी वृक्षप्राधिकरण समिती स्थापन केलेली होती. सदर सदस्यांची मुदत संपल्याने निवडून आलेल्या सदस्यांमधून संख्याबळानुसार सदस्य नेमणूक होणे आवश्यक आहे.

संख्याबळाचे प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | २८<br>---- X ९ = २.७०<br>९३ | |
| २. | राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष | २८<br>---- X ९ = २.७०<br>९३ | |
| ३. | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | १९<br>---- X ९ = १.८३<br>९३ | |
| ४. | शिवसेना | १५<br>---- X ९ = १.४५<br>९३ | |
| ५. | बहुजन विकास आघाडी | ०३<br>---- X ९ = ०.२९<br>९३ | |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येचा तौलनिक संख्याबळातुन पुर्णांकाच्या आधारे प्रथम पक्ष गटनिहाय खालील नेमणूका करण्यास प्रस्तावित.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | भारतीय जनता पार्टी | - | ०३ |
| २. | राष्ट्रवादी काँग्रेस | - | ०३ |
| ३. | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | - | ०२ |
| ४. | शिवसेना | - | ०१ |
| ५. | बहुजन विकास आघाडी | - | ०० |

वरील प्रमाणे वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य निवड होणेस प्रस्तावित.

नगरसचिव

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/१०/२०१३

### // गोषवारा //

**प्रकरण क्र. ४३ :- महिला व बालकल्याण समितीवर नऊ सदस्यांची नेमणूक करणे.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१(१)१(अ) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठित करण्याची तरतूद आहे. महिला व बालकल्याण समिती ९ सदस्यांची गठित करणेकरिता खालीलप्रमाणे आजमितीस असलेल्या सदस्य संख्येवरुन तौलानिक संख्या निश्चित करण्यात येत आहे.

संख्याबळाचे प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | २८ / ९३ X ९ = २.७० |
| २. | राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष | २८ / ९३ X ९ = २.७० |
| ३. | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १९ / ९३ X ९ = १.८३ |
| ४. | शिवसेना | १५ / ९३ X ९ = १.४५ |
| ५. | बहुजन विकास आघाडी | ०३ / ९३ X ९ = ०.२९ |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येचा तौलनिक संख्याबळातुन पुर्णांकाच्या आधारे प्रथम पक्ष गटनिहाय खालील नेमणूका करण्यास प्रस्तावित.

१. भारतीय जनता पार्टी - ०३
२. राष्ट्रवादी कॉंग्रेस - ०३
३. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस - ०२
४. शिवसेना - ०१
५. बहुजन विकास आघाडी - ००

वरील प्रमाणे महिला व बालकल्याण समिती सदस्य निवड होणेस प्रस्तावित.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.१९/१०/१३, प्रकरण क्र. ४४ करिता

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

## मा. महिला व बालकल्याण समिती

सभा दि. ३०/०९/२०१३

प्रकरण क्र.- १० निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलींच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य देण्याबाबत.

ठराव क्र. - १०

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील निराधार/विधवा महिलांना कोणताही कौटुंबिक आधार नसलेल्या विधवा माहिलांच्या मुलीच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य केल्यास सदर महिलांना आर्थिकदृष्टया मदत होईल. त्या अनुषंगाने प्रत्येकी महिला मुलीच्या विवाहासाठी प्रत्येकी २००० प्रमाणे अर्थसहाय्य केल्यास महिलांना त्यांच्यावरील आर्थिक बोजा कमी करण्यास व मानसिक मनोबल वाढविण्याकरीता मदत होईल असे २५/५/२०११ च्या शासन निर्णयामध्ये नमुद आहे. त्या अन्वये सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात दि.२१/१/२०१३ रोजीच्या महिला व बालकल्याण समितीच्या ठराव क्र.४ अन्वये विधवा महिलांच्या मुलीच्या विवाहाकरीता रु.५०००/- प्रमाणे दोन महिलांना अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे. तरी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महिला व बालकल्याण समितीच्या अंदाजपत्रकात निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलीच्या विवाहाकरीता अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली १५ लाख तरतुद शिल्लक आहे. तरी निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलीच्या विवाह करीता अनुदान देण्यासाठी अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१) अर्जदार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये रहिवासी असावी.
२) मुलीचे विवाहाचे वेळेचे वय १८ वर्षापेक्षा कमी असु नये यासाठी मुलीच्या जन्माचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला जोडावा.
३) कुटूंबाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार यांचेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.
४) या योजनेखालील अनुदान फक्त दोन मुलींच्या विवाहासाठी अनुज्ञेय राहील.
५) अर्जदाराच्या मुलीचा विवाह निश्चीत झाल्यानंतर अथवा विवाहानंतर ३० दिवसापर्यंत करण्यात आलेले अर्ज ग्राहय समजण्यात येतील.
६) अर्जदार महिलेने पतीच्या निधनाबाबतचा दाखला अर्जासोबत जोडण्यात यावा.
७) मुलीचा विवाह नोंदणी झाल्याबाबतचा विवाह नोंदणी दाखला किंवा लग्नपत्रिका अर्जासोबत जोडावी.
८) सदरचे अनुदान पुर्नविवाहाकरीता देण्यात येणार नाही.

तरी निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलीच्या विवाहाकरीता १2.1.0.9.0 अनुदान देण्यासाठी मा. महासभेस हि सभा शिफारस करीत आहे.

सुचक सुनिता पाटील    अनुमोदन वंदना पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
महिला व बालकल्याण समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

I:\...\Mahila Bal Kalyan Vibhag\Tharav\Niradhar Vidhava Mahilana Arthsahya Karne babat.doc

मा. महासभा दि. १९/१०/१३, प्रकरण क्र. ८५ करिता

# मिरा-भाईंदर महानगरपालिका ।

## मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

## मा. महिला व बालकल्याण समिती

सभा दि. ३०/०९/२०१३

**प्रकरण क्र. ११ -** निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलामुलींना आर्थिक मदत प्रदान करणेबाबत

**ठराव क्र. ११ -**

मिरा भाईंदर क्षेत्रातील निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलामुलींना **आर्थिक मदत** दिल्यास सदर महिलेला आर्थिक दृष्टया मदत होईल तसेच मुलांमुलींना पुढील शिक्षण देण्यास **निराधार/विधवा/घटस्फोटीत** महिलांना सोयीचे होईल. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात महिला व बालकल्याण योजने अंतर्गत १५ लाख तरतुद शिल्लक आहे. तरी निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलांच्या मुलामुलींना प्रस्तावित आर्थिक मदत खालीलप्रमाणे.

**आर्थिक मदत :-**

| शैक्षणिक वर्ग | वार्षिक मदत रुपये |
|---|---|
| १ ते ५ | ३००० रु. |
| ६ ते ८ | ४००० रु. |
| ९ ते १२ | ५००० रु. |
| १२ ते पदवी | ६००० रु. |

**आर्थिक मदत देणेसाठी योजनेच्या अटीशर्ती :-**

१) महानगरपालिका क्षेत्रामधील रहिवासी असावा.
२) बोनाफाईड सर्टिफिकेट
३) शिधापत्रकाची सत्यप्रत.
४) निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलेचे वय १८ ते ५० पर्यंत असावे.
५) अर्जासोबत वडीलांचा मृत्युदाखला व घटस्फोटीत असल्यास त्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
६) कुटूंबाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार, ठाणे यांचेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.
७) कुटुंबातील दोन मुलानांच या योजनेचा लाभ घेता येईल.
८) या वर्षाची शैक्षणिक फी संबधी शैक्षणिक शुल्क मागणी पत्र/शुल्क भरणा केलेला असल्यास पावती जोडणे आवश्यक आहे.
९) अर्जा सोबत जोडण्यात आलेले सर्व छायांकीत कागदपत्रे सक्षम अधिकाऱ्याने प्रमाणित केलेली असावीत.
१०) दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने आर्थिक मदत मंजुर करणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

तरी निराधार/विधवा/घटस्फोटीत महिलेच्या मुलामुलींना आर्थिक मदत प्रदान करणेबाबत मा. महासभेस शिफारस करीत आहे.

सुचक वंदना पाटील — अनुमोदक सौ सुमिला पाटील

ठराव सर्वानुमते

सभापती
महिला बालकल्याण समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १९/१०/२०१३
## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ४६ :- महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांचेकडून दरवर्षी दिवाळी सणा कालावधीत सानुग्रह अनुदान देण्याची मागणी करण्यात येते.

दि. ३१/१०/२००२ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिका कामगार संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये, महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार करुन, सानुग्रह अनुदान किती द्यावे या बाबतचा निर्णय महानगरपालिका स्तरावर घेण्यात यावा. अशा प्रकारचा निर्णय झाला होता. त्यानुसार नगरविकास विभागाचे पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.२६१/नवि-२४, दि. २७/११/२००२ रोजीच्या पत्रान्वये सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आलेले आहे. आणि त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे बाबत मा. महासभेमार्फत योग्य निर्णय घेतला जातो.

सन-२०१२ मध्ये महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. २०, दि. १४/१२/२०१२ अन्वये मंजूर करुन अदा करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदान तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी प्रकार | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २०११-१२ | सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४४८ | ७८०० | ११२९४४०० |
| २ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९३ | ७५०० | १४४७५०० |
| ३ | संगणक चालक/लघुलेखक (अस्थायी) | ७७ | ५००० | ३८५००० |
| ४ | बालवाडी शिक्षिका | ०५ | ४००० | २०००० |
| ५ | आर.सी.एच. कर्मचारी (अस्थायी) | २९ | ५००० | १४५००० |
| ६ | क्षयरोग नियंत्रण व आय.सी.टी.सी. कर्मचारी | २७ | ४००० | १०८००० |
| ७ | लिंक वर्कर | १०६ | ७०० | ७४२०० |

वरील ठरावाच्या अनुषंगे इतर अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान दिलेला तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी प्रकार | कार्यरत अधिकारी /कर्मचारी सन २०११-१२ | सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ८ | सुवर्ण जयंती योजना, (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ३६०० | ७२०० |
| | एकुण | १८८७ | | १३४८१३०० |

अशा प्रकारे १८८७ अधिकारी/कर्मचारी यांना रक्कम रु. १,३४,८१,३००/- एवढे सानुग्रह अनुदान देण्यात आले होते.

चालू वर्षासाठी विविध कर्मचारी व कामगार संघटनानी सानुग्रह अनुदानाची मागणी केलेली आहे.

सानुग्रह अनुदान गतवर्षी प्रमाणे ज्यांना देता येईल अशा प्रकारामधील महानगरपालिका आस्थापनेवरील दि. ३१/०३/२०१३ रोजी कार्यरत स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांची संख्या तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचारी | | कार्यरत अधिकारी/कर्मचारी सन २०१२-१३ |
|---|---|---|---|
| १ | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते ०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | | १४५२ |
| २ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | | १९३ |
| ३ | संगणक चालक, लघुलेखक (ठोक मानधनावरील कर्मचारी) | | ७७ |
| ४ | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | | ०५ |
| ५ | आर. सी. एच. विभाग (ठोक मानधनावरील कर्मचारी) | | २९ |
| ६ | क्षयरोग व कुष्ठरोग नियंत्रण कर्मचारी | | ३३ |
| ७ | लिंक वर्कर | | १२७ |
| ८ | सुवर्ण जयंती योजना, (ठोक मानधनावरील कर्मचारी) | | ०२ |
| ९ | स्व. इंदिरा गांधी रुग्णालय मधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | | १७ |
| | एकुण | | १९३५ |

अशा महानगरपालिकेतील आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना गतवर्षीच्या मंजूर रक्कमानुसार सानुग्रह अनुदान देणेसाठी १ कोटी ३० लाख रुपये खर्च अपेक्षीत आहे. आणि मंजूर वार्षिक अंदाजपत्रकात रक्कम रु. २.०० कोटी तरतुद आहे.

तसेच शिक्षण मंडळाकडील कर्मचाऱ्यांसाठी रक्कम रु. १५.०० लाख खर्च अपेक्षीत आहे. आणि मंजूर अंदाज पत्रकात रक्कम रु. १६.५० लाख इतकी तरतुद आहे.

सबब सदरचा विषय मा. महासभेच्या निर्णयास्तव सादर करणेत येत आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. १७/१०/१३
वेळ - 04=35

स्थायी समिती गोषवारा
रजिस्टर नोंद अ.क्र. २४